साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

वर्ष 31 वे

| परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर, मो.९४२३३३७४८०

| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com

नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.१५५ | पाने-२० | दि.८/१२/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.

॥ श्री कोटलिंग प्रसन्न ॥
स्थलांतर.. स्थलांतर..
शिवम
मजबुती आणि विश्वास एकाच ठिकाणी..!
स्टिल ॲन्ड सिमेंट एजन्सी
टी.एम.टी.बार चे अधिकृत विक्रेते
खडी, क्रॅशसॅण्ड योग्य दरात मिळेल
Authorized Dealer
प्रोप्रा : अमोल बबन ढवळे
(9850125561, 9423339966)
पत्ता : नगर-सोलापूर बायपास रोड, निलज चौक, संत निरंकारी मंडळ, शेजारी, करमाळा.
आयकॉन स्टीलचे अधिकृत विक्रेते

# राज्यपातळीवर भाजपा तर तालुक्यात आ.शिंदे सोबत काम करणार - माजी आमदार जगताप

करमाळा : करमाळा तालुक्याच्या राजकारणात जगताप घराण्याचे योगदान मोठे आहे. स्वतंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात जगताप घराण्याचे काम आहे. स्वातंत्र्यसैनिक म्हणून थोरले साहेब कै.नामदेवराव जगताप यांनी कारावास भोगलेला आहे. त्यानंतर विकासकामामध्ये देशभक्त नामदेवराव जगताप यांच्यानंतर मी स्वत: सातत्याने कार्यरत आहे. सत्तेच्या राजकारणात अलिकडे ताटली-बाटलीचे प्रस्थ वाढले आहे. त्यानुसार आपण राज्याच्या राजकारणात भाजपा सोबत तर तालुक्याच्या राजकारणात विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांच्या सोबत राहणार आहोत; असे मत जगताप गटाचे नेते व माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी व्यक्त केले.



तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतीत पाणी आणण्यासाठी देशभक्त नामदेवराव जगताप यांनी उजनी धरण आणले तर मी दहिगाव उपसिंचन योजनेसाठी प्रयत्न केले. कोळगाव प्रकल्पासाठीही प्रयत्न केले. या सर्व योजना सुस्थितीत चालाव्यात म्हणून आमदार शिंदे प्रयत्नशील आहेत. तालुक्यातील शेतकऱ्यांचे वीज, पाणी हे महत्वाचे प्रश्न आहेत. ते सोडविण्यासाठी तसेच तालुक्यातील युवकांच्या हाताला काम देण्यासाठी आ.शिंदे तसेच राज्यातील भाजपा पुरस्कृत शासन प्रयत्नशील आहेत. त्यामुळे आपण त्यांच्या सोबत आहोत.

...जयवंतराव जगताप (माजी आमदार/सभापती, कृ.उ.बा.समिती करमाळा)

१२ डिसेंबरला श्री.जगताप यांचा वाढदिवस असून त्या निमित्ताने सा.कमलाभवानी संदेशला दिलेल्या मुलाखतीत ते परखडपणे बोलले. पूर्वीचे दिवस बदलले आहेत. वास्तविक पाहता पूर्वीच्या दिवसाची आज गरज आहे. एकत्र कुटूंब पध्दती, राजकारणात तत्वनिष्ठता माणसामध्ये माणुसकी या गोष्टीची गरज आहे. अलिकडे काही लोकांनी शेणखाऊ पध्दती सुरू केली आहे. त्यामुळे समाजातील चित्र बदलले आहे. ताटली-बाटली देणाऱ्यांना मतदान मिळत असेलतर सेवा करणाऱ्यांचे काय ? केवळ पैसा नाही म्हणून विकासकाम करणाऱ्या माणसाला डावलले जात असेलतर आता राजकर्त्या मंडळींनी बदलले पाहिजे. स्वार्थी प्रवृत्तीच्या राजकारणाने शेतकऱ्याच्या ऊसाचे पैसे मिळेनात, शेताला मजूर मिळत नाही. युवकांच्या हाताला काम नाही, शेतकऱ्याला वीज नाही आणि प्यायला स्वच्छ पाणी नाही. सध्याच्या स्थितीत ऊसतोड कामगार व वाहनमालकाचे जे हाल होत आहेत त्याला भ्रष्ट राजकारणी जबाबदार (पान ४ वर)

पुणे येथील सुप्रसिध्द पोटविकार तज्ञ
डॉ.अभिजीत लक्ष्मण नीळ
(M.S.FMAS) (Endoscopist - Laproscopist)
प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या रविवारी
करमाळ्यात उपलब्ध !
17 / 12 / 2023
नांवनोंदणी आवश्यक
पोटविकाराच्या रूग्णांना उपचारासाठी
आता परजिल्ह्यात जायची गरज नाही..,
आता पोटविकार तज्ञ करमाळ्यातच उपलब्ध !
पोटविकारांच्या सर्व समस्यांवर निदान व अल्पदरात उपचार

उपलब्ध सुविधा...
• अत्याधुनिक दुर्बिणीद्वारे निदान व शस्त्रक्रिया (General surgery) लॅप्रोस्कोपी व एन्डोस्कोपी
• कर्करोग (कॅन्सर) उपचार व शस्त्रक्रिया (Onco surgery)
• मूत्रविकार उपचार (Uro surgery)
• अपघात विभाग, सांधेबदल शस्त्रक्रिया (Ortho pedic surgery)
• मेंदू/मणका विकार उपचार शस्त्रक्रिया (Nuro surgery)
• स्त्रीरोग व प्रसुतितज्ञ विभाग (Gynaec surgery)
• मुळव्याध/भगंदर-फिशियर उपचार व शस्त्रक्रिया (Piles surgery)
एन्डोस्कोपी
माफक दरात उपलब्ध
(एन्डोस्कोपीसाठी उपाशीपोटी यावे)

पत्ता
शिवश्री क्लिनिक
सचिन मेडिकल समोर, B.M. कॉम्प्लेक्स, दत्तपेठ, करमाळा.(9860982072)
संपर्क...
मो.8291174004
मो.9860982072
मो.9096613132
■ स्पर्श हॉस्पिटल रहाटणी, पुणे.
■ स्पर्श हॉस्पिटल काळेवाडी, पुणे
■ अमृते/स्पर्श हॉस्पिटल चिंचवड(पुणे)

संस्कार तर टिकले पाहिजेच पण सर्वांगीण विचार करून !

## संपादकीय.........................................!

# लग्न..!

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात 'लग्न' हा संस्कार महत्वाचा आहे. हिंदू धर्मात जन्माला आलेल्या व्यक्तीबाबत जन्मापुर्वी संस्कार सुरू होतात आणि ते संस्कार मृत्यूनंतरही सुरू राहतात. त्याची संख्या १६ आहे. या १६ मध्ये विवाह हा १३ वा संस्कार आहे. स्त्री व पुरूष यांना एका धाग्यात बांधून आयुष्याचे सोबती, जीवाभावाचे साथीदार करण्याचे काम 'विवाह' हा संस्कार करत असतो. फार पुर्वीपासून स्त्री व पुरूष हे प्रजाननासाठी एकत्र येत होते. संतती व ती सुध्दा संस्कारक्षम होण्यासाठी ऋषी-मुनींनी चिंतन केले व त्यातून विवाह संस्कृती निर्माण झाली.

विवाह संस्कार महत्वाचा असलातरी अलीकडे त्यामध्ये बरीच थोंताडे नियाली असून, मनाला वाटेल ती बाब संस्कार म्हणून त्यात घुसडली आहे. विवाहाची परंपरा हजारो वर्षापासून अस्तित्वात आहे. त्यामध्ये विवाहाचे अनेक प्रकार आहेत. आपणाला सर्रास गांधर्व विवाह, स्वयंवर व सर्वसाधारण विवाह हे प्रकार माहित आहेत. असे असलेतरी विवाहचे आठ प्रकार सांगितले आहेत. १) ब्राम्ह- या विवाह पध्दतीत वराला आपल्या घरी बोलावून विधीपूर्वक वस्त्रालंकार देवून कन्या अर्पण केली जाते. २) दैव - या पध्दतीमध्ये कन्येला यथाशक्ती अलंकारभूषणे देवून नवऱ्याकडे पाठवले जाते. ३) प्राजापत्य - या पध्दतीमध्ये वधू व वरांनी परास्परानुकूल आणि धर्मनिष्ठपणे राहण्याची प्रतिज्ञा घेऊन संसार केला जातो. ४) आर्ष - या पध्दतीमध्ये वराकडून गाई-घोडे किंवा धन घेऊन कन्या दिली जाते. ५)गांधर्व - या पध्दतीमध्ये वर व वधू यांनी स्वत:च विवाह ठरवणे व आजन्म एकत्र राहण्याचा निर्णय घेऊन एकरूप होतात.६) आसूर - वराकडील लोकांनी कन्येच्या पित्याला भरपूर रक्कम देणे व वधूला घेऊन जाणे. ७) पैशाच - या पध्दतीमध्ये कन्येचा पिता झोपलेला असताना किंवा बेसावध असताना वधूला पळवून नेणे व तिच्या बरोबर विवाह करणे. ८) राक्षक - या पध्दतीमध्ये वधूच्या पित्याचा विरोध असूनही त्याच्या विरोधात किंवा वधूचा विरोध असूनही तिच्या विचाराच्या विरोधात लग्न केले जाते. जर यामध्ये कोणी आलातर त्याची हत्या करून हा विवाह केला जातो.

सध्या ब्राम्हविवाहची पध्दत सर्रास चालू आहे. जुन्या परंपरेनुसार बहुतेक पध्दतीमध्ये वधूकडील बाजूलाच रक्कम देण्याची प्रथा दिसून येते. शक्यतो वधूकडील पक्षाला कोणताही खर्च पडू नये, हे पुर्वजांचे धोरण आहे. पण मधल्या काळात नेमके त्या विरूध्द चालू होते. मुलीकडील परिवाराचे हाल केल्याशिवाय एकही लग्न लागत नव्हते. वेदामध्ये विवाहाबदल जी बाजू मांडली आहे, त्यामध्ये कोणीही कोणाकडून पैसे घेऊ नये; असे स्पष्ट बजावले आहे. पण आपल्या प्रथा या खूपच वेगळ्या आहेत. हुंडा देणे वा घेणे हा कायद्याने गुन्हा ठरवला आहे,परंतू कोणत्यांना कोणत्या माध्यमाने हुंड्याशिवाय विवाह होत नव्हते. पण मधल्या काळात सोनाग्राफी यंत्र आले व त्याने अनेक मुलीच्या गर्भातच भ्रुणहत्या झाल्या. त्यामुळे मुलींची संख्या कमी होऊन मुलांची संख्या झाली जास्त झाली. त्यामुळे गेल्या पाच वर्षापासून मुलांचे लग्न होणे ही मोठी समस्या निर्माण झाली आहे. असो...!

विवाहमध्ये मंत्रोच्चाराला महत्व आहे. विवाह हा होमहवानादी क्रियेने केला जातो. विवाहाच्या सर्वच गोष्टी या अग्नीला साक्ष ठेवून केल्या जातात. थोडक्यात अग्नीलगतच विवाहाचे कार्य होत असल्याने ल+ अग्न =लग्न असे म्हणतात. लग्नामध्ये मंत्रोच्चाराला मोठे महत्व असताना, अलीकडे डॉल्बी, ऑर्केस्ट्रा, बॅन्ड, ऑर्गन अशा विविध वाद्यांचा लग्नात धुमाकूळ असतो. मंडप हा सावलीसाठी देण्याची प्रथा असताना ती फॅशन ठरली आहे. जेवढा मोठा मंडप, तेवढे मोठे लग्न समजले जाते. आलेल्या पाहुण्याचे स्वागत करणे, त्यांना आग्रहाने जेवावयास देणे या प्रथा होत्या; पण त्याचे विडंबन होत आहे. अजूनही ग्रामीण भागात रस्त्यावर, मातीत उघड्यावर जेवायला बसवले जाते. जेवणासाठी कोणतीही सुविधा नसते. द्रोण तर गळके असतात. पंतरवाळीतील अन्न जमीनीत सांडले जाते. लग्नातील भोंगा एवढा मोठा असतो, की त्याने कानाचा पडदा फाटतो की काय..? अशी स्थिती असते. मंगलाष्टके स्वरचीत असतात. त्याला ना शस्त्रोक्त अर्थ ना संस्कृतीचे महत्व. अशा लग्नात वेगवेगळ्या समाजाच्या वेगवेगळ्या प्रथा आहेत. एका समाजात लग्नात भांडण केल्याशिवाय लग्न कारणी लागत नाही. जोरदार मारामारी म्हणजे लग्न परिपुर्ण. एका समाजात तर लग्नाआधी देवाला रेड्याचा बळी द्यायचा. तो असा तसा नाहीतर रेडा गच्च बांधायचा, त्याला सुऱ्याने वेगवेगळ्या जागेवर भोसकायचे, त्याचे रक्त काढायचे मग तो मेल्यावर शिजवायचा. अशी क्रूर पध्दत वापरली जाते. काही ठिकाणी मुलीच्या वडीलास लग्नात दूर ठेवले जाते. काय प्रथा असतील हे सांगता येत नाही.

एका समाजात लग्नाअगोदर जात्याला मांजर बांधावे लागते मगच लग्न लागते. या प्रथेचा पाठपुरावा केला असता समजले, की त्या कुंटूबाच्या पुर्वजाच्या लग्नाप्रसंगी घरातील लोक उचलून लग्नाला जात असताना, घरी कोणीतरी राखण ठेवायचे ठरले. घरातील एक वृध्द व्यक्तीला घरी राखण राहयचे ठरले. त्यावेळी ते गृहस्थ म्हणाले, 'मी राखण राहतो पण मांजर बांधून टाका.' मांजराला बांधायला जागा नव्हती, कोणीतरी ते मांजर जात्याला बांधले. या परिवारातील पुढच्या लग्नावेळी एका व्यक्तीने हे लक्षात ठेवले व या परिवारातील पुढच्या लग्नावेळी एका व्यक्तीने हे लक्षात ठेवले व त्याने आपल्या नातेवाईकांना सांगितले. लग्नाच्यावेळी मांजर जात्याला बांधावे लागते. हीच प्रथा रूढ झाली. पुढे घरात मांजर नव्हते तर त्या परिवारातील लोक शेजाऱ्याचे मांजर उसणे आणून जात्याला बांधत व लग्न लावत. अशा अनेक प्रथा लग्नामध्ये आहेत. अशा प्रकारे आपण लग्नाचा मुळ उद्देश विसरलो आहोत. लग्न हा संस्कार न राहता तो समारंभ झाला आहे. तो प्रतिष्ठेचा मुद्दा ठरला आहे.

लग्नाच्या निमंत्रणाची, तांदळाची जागा पत्रिकेने घेतली. पत्रिका केवढी असावी, एका परिवाराने एका पत्रिकेसाठी ६००० रूपये मोजून छापली होती. त्यावर सुवर्णाची अक्षरे कोरली होती. किती महागड्या पत्रिका छापल्या जातात, त्याचा मेळ नाही. पत्रिकेवर कोणाची व किती नावे असावीत याचा मेळ नाही. शेकडो नावे छापून, माणसांना आपलेसे करण्यासाठी ही लग्नपत्रिका माध्यम ठरवले जात आहे. प्रत्येक बाबतीत विडंबन केले जात आहे. (कोरोना पासून बरेच जण व्हाटस्‌ॲपवर पत्रिका पाठवतात, ही चांगली गोष्ट आहे.) एकाने केले की दुसरा त्याच्या दुप्पट खर्च करू लागला आहे. मोठ-मोठे कार्यालये, घोडा, वाजंत्री, जेवणावळी, कपड्याचा बस्ता, सोन्याचे दागीणे, भांड्याचा बस्ता, प्रवासासाठी वाहनाची व्यवस्था, निमंत्रण पत्रिका, वर्धावा व त्याबरोबर नाचणारे त्याचे मित्र त्यासाठी आणावी लागणारी दारू. लग्नानंतर काढल्या जात असलेल्या वराती आणि यानिमित्ताने हजारो पाहुण्यांना बोलावून वेळेवर लग्न न लावता त्यांना तासन तास ताटकळ ठेवून त्यांचा वेळ घेण्याची असलेली पध्दत, त्यानंतर साडे कार्यक्रम, सोळावा, जागरण गोंधळ , देवदेव असे अनेक कार्यक्रम यानिमित्ताने होतात. या कार्यक्रमाचे काय औचित्य हे कोणालाच समजत नसलेतरी त्यातून हजारो रूपयाचा चुराडा होत असून एक-एक घर शुभविवाहच्या निमित्ताने शुभ ऐवजी अशुभ होऊन जाते. लाखो रूपये खर्च करून भविष्याची कोणतीही सुरक्षितता न राहणाऱ्या या लग्नाचे भवितव्य कठीण होऊ लागले आहे.

हे आठवण्याचे कारण म्हणजे श्रीराम प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश चिवटे यांनी ४ फेब्रुवारी २०२४ रोजी सामुदायिक विवाहाचे आयोजन केले आहे. अन्य उद्योग करण्यापेक्षा या सामुदायिक विवाहात आपले परिवारातील जमलेले विवाह केले तर संस्कार तर जतन होईलच पण कोणताही खर्च होणार नाही. हजारो वऱ्हाडी मंडळीचा वेळ वाचेल व एक चांगल्या उपक्रमाला साथ दिल्याचे पुण्य लाभेल.

पदमावती देवी महिला ना.सह.पतसंस्था मर्या; करमाळा

**तात्काळ सोनेतारण कर्ज योजना**

आमचे पतसंस्थेमार्फत गरजूंसाठी
तात्काळ सोनेतारण कर्जाची सोय उपलब्ध केली आहे.

**दरमहा फक्त 1% व्याजदराने कर्ज**

रू.40 ते 45000 पर्यंत प्रति तोळा रक्कम मिळेल !

पत्ता : गुजरगल्ली, करमाळा. मो.9421063921

* नियम व अटी लागू.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)


12 डिसेंबर
करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व माजी आमदार
मा.श्री.जयवंतरावजी जगताप साहेब
आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख.. हार्दिक शुभेच्छा
प्राचार्य
श्री.पी.ए.कापले
उपप्राचार्य
श्री.ए.एच.बागवान
पर्यवेक्षक
श्री.बी.के.पाटील
पर्यवेक्षिका
सौ.सुनिता नवले मॅडम
उच्च माध्य.विभागप्रमुख
श्री.व्ही.एल.पवार
शुभेच्छुक
महात्मा गांधी माध्य., उच्च माध्यमिक व तांत्रिक प्रशाला, करमाळा.
सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी


भाजपा युवा मोर्चाचे
जिल्हाध्यक्ष व युवा नेते
मा.श्री.शंभुराजे जगताप
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
तसेच करमाळा
तालुक्याचे किंगमेकर
कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व माजी आमदार
मा.श्री.जयवंतराव जगताप साहेब
यांना १२ डिसेंबर रोजी असलेल्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
ओजस हॉस्पिटल
(कुंभार हॉस्पिटल)
डॉ.रोहन रामदास कुंभार
B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ
डॉ.मनोज रामदास कुंभार M.D. कन्सलटींग फिजीशियन
सुभाष चौक, मेनरोड, करमाळा, जि.सोलापूर
माजी सभापती
श्री.रामदास कुंभार सर
सौ.सीमा कुंभार मॅडम
(क.न.प. शिक्षण व महिला समिती)


करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे
सभापती, सोलापूर जिल्हा बँकेचे
संचालक, करमाळा तालुक्याचे किंगमेकर
व माजी आमदार
12 डिसेंबर
मा.श्री.
जयवंतराव
जगताप साहेब
आपणांस वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ
ग्रामपंचायत बोरगाव, ता.करमाळा.

पान १ वरून पुढे...

# राज्यपातळीवर भाजपा तर तालुक्यात आ.शिंदे सोबत...

आहेत. त्यामुळे तालुक्यातील जनता बदलत नाही तोपर्यंत अशा चुकीच्या गोष्टी घडत राहणार आहेत. या सर्व गोष्टी बदलासाठी आपण आ.संजयमामा शिंदे यांचे सोबत काम करत आहोत व यापुढेही करत राहू. यावर्षी दुष्काळी स्थिती आहे. जानेवारी नंतर पाण्यासाठी फार संघर्ष करावा लागणार आहे. अन्न आणि पाणी या दोन गोष्टी सर्वसामान्यां पर्यंत सहज उपलब्ध झाल्या पाहिजेत. या करीता आपण योग्य ते धोरण आखून सर्वसामान्यांची जेवढी सेवा करता येईल तेवढी करणार; असेही जगताप यांनी सांगितले.

# संगोबा येथील श्री आदिनाथ मंदिराच्या जीर्णोध्दाराचे काम सुरू

## रोख किंवा वस्तुस्वरूपात मदत करण्याचे विनय ननवरे यांचे आवाहन




करमाळा(सं.प्र.) : प्रसिध्द तीर्थक्षेत्र संगोबा येथील श्री आदिनाथ महाराज मंदिराच्या जीर्णोध्दाराचे काम चालू असून, भाविकांनी रोख अथवा वस्तुस्वरूपात मदत करण्याचे आवाहन बोरगावचे माजी सरपंच व सामाजिक कार्यकर्ते विनय ननवरे यांनी केले.

तीर्थक्षेत्र संगोबा येथील श्री आदिनाथ महाराज मंदिराच्या तटबंदीची अनेक ठिकाणी पडझड झाली आहे. मंदिराच्या आत मध्ये व बाहेर अनेक दुरूस्तीची कामे करायची आहेत. तसेच नदीच्या कडेला असणाऱ्या पायऱ्या या ठिकाणीही दुरूस्ती करणे गरजेचे आहे. मंदिराचा बाहेरील ओठा व अन्य सुशोभिकरण करायचे आहे. यासाठी रोख अथवा वस्तु स्वरूपात भाविकांनी मदत करावी. या कामास गेल्या तीन महिन्यापासून प्रत्यक्षात सुरूवात झाली आहे. मंदिराच्या तटबंदीचे काम काही स्वरूपात केलेले आहे. तसेच बाहेरील ओट्याचेही काम केलेले आहे. जीर्णोध्दारासाठी आणखीन बरेच काम अपूर्ण असून त्यासाठी देणगीची आवश्यकता आहे. तरी भाविकांनी या जीर्णोध्दारासाठी स्वइच्छेने मदत करावी (भ्रमणध्वनी-९८५०१११३१) असेही आवाहन श्री.ननवरे यांनी केले आहे.

## करमाळा तालुका साहित्य मंडळाच्या वतीने

# काव्यलेखन स्पर्धा - १५ डिसेंबर पर्यंत साहित्य पाठविण्याचे आवाहन

करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुका साहित्य मंडळाच्या वतीने काव्यलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा आठवी ते दहावी,महाविद्यालयीन गट (११ वी पुढील) व खुला गट या तीन गटामध्ये होणार आहे. प्रत्येक गटातून तीन क्रमांक काढण्यात येणार असून विजेत्यांना अनुक्रमे ५०० रू, ३०० रू , २०० रू. रोख व आकर्षक ट्रॉफी दिली जाणार आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांची कविताही स्वरचित असावी ती दीर्घ (जास्तीत जास्त २० ओळी) नसावी. कवितेखाली स्वत:चे नाव, शाळेचे/महाविद्यालयाचे नाव व मोबाईल नंबर लिहावे. सदरच्या कविता १५ डिसेंबर पर्यंत व्हॉटस्अप क्रमांक ७३८७४४६७७१ वर पाठवाव्यात. तसेच अधिक माहितीसाठी कवी खलील शेख व कवी दादासाहेब पिसे (८३२९९०७४२४) यांच्याशी संपर्क साधावा.

**प्रियंका आय केअर हॉस्पीटल**
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री

डॉ.डी.बी.केमकर (M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा. मो.9527268181 / 9860872619

# तालुका प्राथ.शिक्षक पतसंस्थेची ८३ वी वार्षिक सभा संपन्न




करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेची ८३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आदिनाथ देवकते यांच्या अध्यक्षतेखाली यशकल्याणी सेवाभवन येथे पार पडली. याप्रसंगी यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, शिक्षक नेते बाळासाहेब गोरे, सेवानिवृत्त शिक्षक दत्तात्रय चोपडे, आबासाहेब गोडसे तसेच संचालक प्रताप काळे, निशांत खारगे, अरूण चौगुले, व्हा.चेअरमन तात्यासाहेब जाधव, साईनाथ देवकर, सचिव अजित कणसे, सतीश चिंदे, वैशाली महाजन, पुनम जाधव, तज्ञ संचालक वसंत बदर, व्यवस्थापकीय संचालक दिपक जाधव उपस्थित होते.यावेळी बोलताना करे-पाटील म्हणाले, की शिक्षक पतसंस्था अ वर्गात असल्यामुळे विश्वासास पात्र असून शिक्षकांचा आर्थिक कणा आहे.

या सभेत नूतन इमारत बांधकाम, मयत सभासद सहाय्यता निधी उभारणे, ठेवी स्वीकारणे, ७.२० टक्के वरून ८.४० टक्के व्याजदर करणे यासह इतर अनेक विषयांवर चर्चा करून ठराव मंजूर करण्यात आले. यावेळी राज्य आदर्श शिक्षक बाळासाहेब बोडखे, जिल्हा आदर्श शिक्षक भारत भानवसे, प्रफुल्लता सातपुते, राणी क्षीरसागर, संपत नलावडे, श्रीकृष्ण भिसे, सतीश शिंदे, पंकज गोडगे, तसेच शिष्यवृत्ती, नवोदय, सैनिकी स्कुल व दहावी, बारावी, वैद्यकिय, स्पर्धा परीक्षा आदी विभागातून यश संपादन केलेल्या सभासदांच्या पाल्यांचा गौरव करण्यात आला. सुत्रसंचालन अनिल यादव यांनी केले तर प्रास्ताविक प्रताप काळे यांनी केले. उपस्थितांचे आभार तात्यासाहेब जाधव यांनी मानले. विषय पत्रिकेचे वाचन अजित कणसे यांनी केले.







# R.K. & ASSOCIATES

Pune Road, Rambhapuragalli, Karmala, Dist- Solapur

## मुले/मुली पाहिजेत

**Job Description**

- Day to day accounts works
- Data entry
- Bank works
- Day book closing
- Collections work if any
- Tallying the payments & amount received
- Follow up with creditors
- And other related works

Job Type: Full time

**Contact : 9146941551, 9112319894**

Email- Ramvkale92@gmail.com










# वाहतूकदार व वाहनमालकांना न्याय मिळवून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही

## घंटानाद आंदोलनप्रसंगी शंभुराजे फरतडे यांचा इशारा

करमाळा(सं.प्र.) : ऊसतोड मजूर देतो म्हणून फसवणूक केलेल्या ऊस वाहतूकदार व वाहनमालकांना न्याय मिळवून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही; असा इशारा युवा सेना तालुकाप्रमुख शंभुराजे फरतडे यांनी दिला आहे.

शिवसेना माजी तालुकाप्रमुख शाहुराव फरतडे यांच्या नेतृत्वाखाली करमाळा तहसील व पोलीस निरीक्षक कार्यालय समोर ऊसतोड मुकादमाकडून फसवणूक झालेल्या वाहतूकदारांचे गुन्हे दाखल करून घ्यावेत;या मागणीसाठी युवासेना (ठाकरे गट) यांचे वतीने घंटानाद आंदोलन करण्यात आले. त्यावेळी श्री.फरतडे बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, की तालुक्यातील ऊस क्षेत्र व कारखाने यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या सुशिक्षित बेरोजगार युवकांनी विविध बँक, फायनान्स तसेच सावकारी कर्ज काढून वाहने व ऊसतोड टोळ्या करून ऊस वाहतूक व्यवसाय सुरू केला होता. मात्र ऊसतोड मुकादम हे पैसे घेऊन देखील कामगार (कोयते)देत नसल्याने अनेक युवक कर्ज बाजारी झाले आहेत. त्यांच्यावर आत्महत्येची वेळ आली आहे. हा आकडा कोट्यावधी रूपयांच्या घरात जात असून ज्या वाहतुकदार कडे नोटरी, चेक, बँक व्यवहार तपशील असेल त्यांचे गुन्हे दाखल करून घ्यावेत. तसेच विशेष पथक तयार करून याचा सखोल तपास करून पैसे मिळवून द्यावेत; अशी आग्रही मागणी श्री.फरतडे यांनी केली आहे. ऊस वाहतूकदार यांच्या जोरावरच कारखाने सुरू आहेत. कारखानदारांकडून यांना उचल देण्यात येते; परंतु टोळी न आल्यास व ऊस पुरवठा न झाल्यास कारखानदारांकडून ऊस वाहतुक-



दारांवर गुन्हे दाखल होतात. मात्र कारखाना व लोकप्रतिनिधीकडून मात्र ऊस वाहतूकदारांची कोट्यावधींची फसवणूक होवून देखील दखल घेतली जात नाही हे दुर्दैव असल्याचे देखील फरतडे यांनी नमूद केले.

यावेळी पोलीस निरीक्षक जोतीराम गुंजवटे ज्यांच्याकडे योग्य ते पुरावे असतील त्यांचे तात्काळ गुन्हे दाखल करून घेतले जातील; असे आश्वासन यांनी दिले. आंदोलकांचे निवेदन तहसीलदार विजयकुमार जाधव, पोलीस निरीक्षकजोतीराम गुंजवटे यांनी स्विकारले. यावेळी शिवसेना माजी तालुकाप्रमुख शाहुराव फरतडे, माजी उपतालुकाप्रमुख ॲड.विकास जरांडे, श्रीहरी तळेकर, युवा सेना उपजिल्हाप्रमुख मयुर यादव, शिवसेना शहरप्रमुख प्रविण कटारिया, तालुका सरचिटणीस पांडूरंग ढाणे, उपशहरप्रमुख संतोष गानबोटे, पंकज परदेशी, कल्पेश राक्षे, पै.आदित्य जाधव, मयुर तावरे, अनिकेत नवगण, भाऊ मस्तुद, विनोद पाटील, बाळराजे फरतडे, पप्पू निकम, सुरज पुजारी, दत्ता डौले, ऊसवाहतुकदार चंद्रकांत लबडे (शेटफळ), स्वप्नील गोडगे (सोगाव), बालाजी देवकर (वडशिवणे), गोरख काकडे (टाकळी), येताळ हाकले (कावळवाडी), गणेश नरसाळे (मांगी), हरी गुळवे (टाकळी) आदी उपस्थित होते.

# मुथानगर येथील रहिवाशी अशोक दहिदुले यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील मुथानगर येथील रहिवाशी अशोक दहिदुले (वय-६८) यांचे नुकतेच निधन झाले आहे. स्व.डॉ.एस.टी.शहा यांचे विश्वासू सहाय्यक कर्मचारी म्हणून ते सर्व करमाळा वासियांना परिचीत होते.आपल्या मनमिळावू प्रेमळ स्वभावामुळे सगळे त्यांना आण्णा म्हणत होते. विनम्र व तात्काळ सेवेसाठी ते सदैव कार्यरत होते. त्यांच्या मागे तीन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. हिंदू स्मशानभुमी विकासनगर करमाळा येथे त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते.

करमाळ्यात प्रथमच आपल्या सेवेत...
सचिन महामुनी
रियल ईस्टेट रेन्टल एजन्सी
आपल्या घरासाठी किंवा दुकान गाळ्यासाठी आपल्याला हवा तसा भाडेकरू मिळवून देणारी व आपल्याला हवे तसे घर व दुकान गाळा किंवा ऑफिससाठी जागा भाडेतत्वावर मिळवून देणारी **सचिन महामुनी रियल ईस्टेट रेन्टल एजन्सी**
आजच संपर्क साधा : मो.9158744810
पत्ता : सुभाष चौक, करमाळा., जि.सोलापूर

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर–बारामती–सोलापूर खुशखबर
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
आता आपल्या करमाळ्यात !
उपलब्ध सुविधा...
- मुळव्याधवर इंजेक्शन
- डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे
- संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे
- संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे
- भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड
करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई

विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
नाव नोंदणीसाठी संपर्क मो.9763035862
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# शेटफळ येथे लाडक्या गायीचा डोहाळे जेवणाचा कार्यक्रम

करमाळा(सं.प्र.) : शेटफळ येथील एका शेतकऱ्याने आपल्या लाडक्या गायीचा डोहाळे जेवणाचा कार्यक्रम मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला. यानिमित्त गाव जेवण घालून सायंकाळी भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

ग्रामीण भागात एक म्हण प्रचलित आहे.. हौसेला मोल नसते. म्हणजे जर एखाद्या गोष्टीची हौस करायची असेलतर खर्च किती होईल याचा विचार केला जात नाही. अशाच पध्दतीने शेटफळ येथील शेतकरी परमेश्वर गोरख पोळ यांनी चक्क आपल्या लाडक्या गायीचा डोहाळ जेवणाचा मोठा कार्यक्रम आयोजित केला होता. यानिमित्ताने सर्व पाहुणे मंडळींना निमंत्रण पाठवले तसेच गावातील सर्व महिलांना आपल्या शेतातील गोठ्यावर बोलावून डोहाळे जेवणाचा मोठा जंगी कार्यक्रम साजरा केला. यावेळी एखाद्या गरोदर महिलेचा ज्याप्रमाणे डोहाळे जेवणाचा कार्यक्रम होतो, अशाचप्रकारे सर्व सोपस्कार पार पडले.



गोठ्यात मंडप घालण्यात आला. यामध्ये लाईट डेकोरेशन करण्यात आले होते. गायीला सजवून ओवाळण्यात आले. सर्वांचे गायी सोबत फोटोसेशन झाले. गायीला हिरवा चारा, पंचपक्वानाचे जेवण घालण्यात आले. आलेल्या सर्व पाहुणे मंडळी महिला व ग्रामस्थांनाही जेवणाचा बेत करण्यात आला होता. नंतर गावातील भजनी मंडळींचा भजनाचा कार्यक्रम झाला. भारतीय संस्कृतीमध्ये गायीला देव मानले आहे. तिचाही सन्मान व्हावा व तिच्या ऋणातून काही प्रमाणात उतराई होण्यासाठी आम्ही हा कार्यक्रम आयोजित केला होता; असे मत परमेश्वर पोळ यांनी व्यक्त केले

घर आणि शेड विकणे आहे
२८ X ४० सुस्थितीत आरसीसी बांधकाम असलेले घर तसेच ३० X ४० या साईजमधील पत्र्याचे शेड योग्य किंमतीत विकणे आहे.
संपर्क : मो.9689557710

प्रवेश! महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे संचलित सरकारमान्य प्रवेश!!
अशोक कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट
इंग्रजी : (३०-४०) मराठी : (३०-४०) हिंदी : (३०-४०)
टायपिंग क्लाससाठी प्रवेश देणे सुरू आहे
किल्ला विभाग, करमाळा. मो.८०८७९०५०८५

# कमलाभवानी मंदिर परिसरात निकृष्ट दर्जाची विकासकामे

## तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष जयेंद्र पवार यांची चौकशीची मागणी





करमाळा(सं.प्र.) : श्रीदेवीचामाळ येथील कमलाभवानी मंदिर परिसरात कमलादेवी मंदिर ते खंडोबा मंदिर केलेला रस्ता, नवीन बांधकाम चालू असलेले भक्त निवास व परिसरात टाकण्यात आलेले सिमेंटचे ब्लॉक आदी सर्व कामे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून, या कामाची चौकशी करण्यात यावी; अशी मागणी तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष जयेंद्र पवार यांनी जिल्हापरिषद बांधकाम विभाग यांचेकडे पाठविलेल्या निवेदनाव्दारे केली आहे.

प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की कमलाभवानी मंदिर परिसरात विविध चालू असलेली कामे ही निकृष्ट दर्जाची आहेत. कमलादेवी मंदिर ते खंडोबा मंदिर केलेला रस्ता अत्यंत हलक्या व निकृष्ट दर्जाचा केलेला आहे. रस्त्यावर लवकरच खड्डे पडण्यास सुरूवात होणार असून, एखादा अवकाळी पाऊस आला तर रस्त्यावरील खडी बाजूला निघून जाईल. भक्त निवासच्या बांधकामात बांधकामात पुरेसे सिमेंट वापरले जात नाही. या बांधकामाचे जे कॉलम तयार केले आहेत ते देखील चुकीच्या पध्दतीने बांधण्यात आले आहे. एक पिलर पूर्णपणे बाहेर आला होता. त्याला फोडून दुरूस्त करण्यात आला आहे. बांधकामाच्या पायाला (बेस) पुरेसे सिमेंट वापरण्यात आले नसून हात लावला तर खडी बाहेर येत आहे. तसेच काही ठिकाणी खालची फरशी न काढता त्यावरच सिमेंट ब्लॉक टाकलेले आहेत. त्यामुळे हे ब्लॉक मजबुतपणे बसले नसून कधीही निघू शकतात. याविषयी संबंधित अधिकाऱ्यास वारंवार कामाचा दर्जा सुधारण्यासाठी विनंती केली; परंतु त्यांनी अरेरावीची भाषा वापरली व तुमच्या पध्दतीने काय करायचे ते करा..असे बोलण्यात आले. यामध्ये झालेल्या कामाचा दर्जा तपासून व सदरील अधिकारी व ठेकेदार यांच्यावर योग्य ती कारवाई करावी. सदरील काम पूर्ण होण्याची तारीख संदर्भात स्पष्टता द्यावी; अशीही मागणी श्री.पवार यांनी निवेदनात केली आहे.

डॉ.राऊत
Advanced dental Clinic & Root Canal Center
दातांचा दवाखाना

उपलब्ध सुविधा...
- इंटराओरल कॅमेराद्वारे तपासणी
- डिजीटल एक्स-रे
- अत्याधुनिक यंत्रणेद्वारे रूट कॅनल ट्रिटमेंट
- वेदनारहित दात व दाढ काढणे
- पडलेले दात बसविणे
- दात साफ करणे
- दाताच्या रंगाचे सिमेंट भरणे/चांदी भरणे


डॉ.कौस्तुभ काशिनाथ राऊत
बी.डी.एस.
(डेन्टल सर्जन)

उपलब्ध सुविधा...
- स्क्रुच्या सहाय्याने दात बसविणे (डेंटल इम्प्लांट)
- अक्कलदाढ काढणे
- वेडेवाकडे पुढे आलेले दात सरळ करणे
- अंशत: किंवा पूर्ण कवळी बसवणे
- हिरड्यांच्या रोगासाठी ट्रिटमेंट
- कॉस्मेटिक ट्रिटमेंट
- कर्करोगाचे निदान
- गरजेनुसार तज्ञ डॉक्टरांच्या भेटी

महात्मा गांधी शाळेच्या पाठीमागे, पुणे रोड, करमाळा. (मो.9552134186)

### कॅन्सरवरील विशेष संशोधनाबद्दल

# प्रा.अश्विनी भोसले-ओहोळ यांना भारत सरकारकडून पेटंट बहाल



करमाळा(सं.प्र.) : येथील रहिवासी असलेल्या आणि सध्या पुणे जिल्हा शिक्षण मंडळ कॉलेज ऑफ फार्मसी हडपसर, पुणे येथे कार्यरत असलेल्या प्रा.अश्विनी भोसले-ओहोळ यांनी कॅन्सर वरील केलेल्या विशेष संशोधनाबद्दल त्यांना नुकतेच भारत सरकारकडून पेटंट बहाल करण्यात आले आहे. गेल्या दोन वर्षाच्या काळात अतिशय मेहन घेऊन त्यांनी एक इन्स्ट्रूमेंट तयार केले होते. ज्यामुळे एखाद्याला फुफ्फुसाचा कॅन्सर आहे का नाही याचे निदान केले जाते. आजकाल कॅन्सरचे रूग्ण मोठ्या प्रमाणात आढळून येतात. मात्र कॅन्सरचे लवकर निदान झाल्यास तो पूर्णपणे बरा होऊ शकतो, ही काळाची गरज लक्षात घेऊन त्यांनी समाजपयोगी असे मशीन तयार केले आणि त्यांच्या गौरवास्पद कार्याची दखल भारत सरकारने घेऊन त्यांना स्मार्ट लंग कॅन्सर डिटेकटींग डिव्हाईससाठी पेटंट बहाल केले आहे. याचबरोबर त्यांच्या आणखी दुसऱ्या संशोधनाला लंडन येथील पेटंटही मिळालेले आहे. पोर्टेबल डिव्हाईस युज्ड फॉर इन कॅन्सर डिटेक्शन साठी त्यांना inteellectual property office united kingdome लंडन यांचेकडून पेटंट मिळाले आहे. साडे येथील डॉ.अशोक भोसले व सुनिता भोसले यांच्या त्या कन्या असून प्रा.संभाजी ओहोळ यांच्या स्नुषा आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतूक केले जात आहे. या सर्व मेहनतीसाठी पती संदीप ओहोळ यांचे अनमोल सहकार्य लाभत आहे; असे अश्विनी भोसले-ओहोळ यांनी सांगितले.

# दिव्यांगांनी न्युनगंड न बाळगता वाटचाल करावी : बबन आरणे



करमाळा(सं.प्र.): सध्या सुशिक्षित बेकार युवकांची संख्या दिवसेंदिवस वाढतच चाललेली आहे. प्रत्येकालाच नोकरी लागेल असे नाही. नोकरीसाठी प्रयत्न करण्यास काहीही हरकत नाही; परंतु दिव्यांग बांधवांनी जिल्हा उद्योग केंद्र किंवा इतर वित्तीय संस्था, महामंडळे यांच्या मार्फत कर्ज उपलब्ध करून आपला स्वत:चा व्यवसाय निर्माण करावा; असे मत बबन आरणे यांनी व्यक्त केले.

जागतिक अपंग दिनानिमित्त नवभारत प्रतिष्ठान रावगाव यांचे वतीने दिव्यांग बांधवांसाठी आयोजित कार्यक्रमात श्री.आरणे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावकामगार पोलीस पाटील बापूसाहेब पाटील हे होते. या कार्यक्रमास केंद्रीय मुख्याध्यापक बबन पाटोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अध्यक्ष भागवत बरडे, अनिल पवार, पै.दादा पवार, हेमंत शिंदे, समता परिषदेचे अध्यक्ष प्रशांत शिंदे, हेमंत शिंदे, हनुमंत पवार, बापू राख, गहिणीनाथ बरडे यांचेसह दिव्यांग बांधव उपस्थित होते. उपस्थितांचे आभार श्री.पवार यांनी मानले.

डॉ.जांभळे पॅथॉलॉजी लॅब
विकी प्लाझा, बसस्टँन्ड समोर, नौशाद कोल्ड्रींक्सच्या वर, पहिला मजला, करमाळा.

पाहिजेत

| अ.क्र. | पद | शैक्षणिक पात्रता | जागा |
|---|---|---|---|
| १ | लॅब टेक्नीशियन | D.M.L.T. | २ |
| २ | सॅम्पल कलेक्शन बॉय | १० वी/१२ वी | २ |

तरी इच्छुक मुले/मुली यांनी पगाराचे अपेक्षेसह त्वरीत वरील पत्त्यावर किंवा मोबाईलवर संपर्क करावा..!

संपर्क : मो.९०२१९०९२६२

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे
करमाळा तालुका वितरक
Ambuja Cement
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.





करमाळा शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या शहराध्यक्ष पदी मुस्लिम समाजाचे युवा नेते अमीर तांबोळी यांची निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल तांबोळी यांचा सत्कार करताना अमोल यादव, सचिन घोलप, विजय लावंड व माजी नगरसेवक अल्ताफशेठ तांबोळी




करमाळा येथील कृष्णाजीनगर, बायपास रोड, लोकरे हास्पीटलच्या शेजारी नव्याने सुरू करण्यात आलेल्या एस.व्ही.मार्ट या मॉलचे ८ डिसेंबरला उद्घाटन करण्यात आले. यावेळी सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या मॉलमध्ये ग्रोसरी, किराणा ड्रायफ्रुटस्, मसाले, प्लॅस्टीक स्टील भांडी तसेच होजिअरी, गारमेंटस्, फुटवेअर, स्टेशनरी आदी प्रकारच्या वस्तू एकाच ठिकाणी उपलब्ध आहेत. भव्य अशा मॉलला नागरीकांनी भेट द्यावी; असे आवाहन एस.व्ही.मॉलच्या टीमने केले आहे.










## पक्षाच्या उत्कृष्ट संघटनात्मक कामाबद्दल

# भाजपा प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांचेकडून गणेश चिवटे यांचा सत्कार



करमाळा(सं.प्र.) : भारतीय जनता पार्टी करमाळा माढा विधानसभा निवडणूक प्रमुख गणेश चिवटे यांनी केलेल्या पक्षाच्या उत्कृष्ट संघटनात्मक कामाबद्दल चक्क भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी श्री.चिवटे यांचा टेंभूर्णी येते भेटीदरम्यान सत्कार केला.

याबाबत अधिक माहिती अशी, की भाजपाचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे हे रात्री उशीरा टेंभूर्णी येथे आले होते. यावेळी जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, माढा तालुका अध्यक्ष योगेश बोबडे, करमाळ्याचे गणेश चिवटे व रामा ढाणे यांनी बावनकुळे यांचे स्वागत केले. त्यानंतर माढा लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने महत्वपूर्ण चर्चा झाली. गणेश चिवटे यांनी करमाळा माढा विधानसभा मतदार संघात केलेले संघटनात्मक काम, पक्षाने दिलेला प्रत्येक उपक्रम त्यांनी यशस्वीरित्या राबवला आहे. यावर प्रभावित होऊन प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी चक्क गणेश चिवटे यांचा सत्कार केला. गणेश चिवटे यांनी आजवर भाजपाचे सर्व नेते कार्यकर्ते यांना बरोबर घेऊन पक्षाचे काम केले आहे. खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटन मजबूत केले आहे. पक्षाचे काम ग्रामीण भागात नेले आहे. या कामाची पावती म्हणून पक्षाने त्यांना जिल्हा नियोजन समिती व केंद्र सरकारच्या दिशा कमिटीवर काम करण्याची संधी दिली आहे.

करमाळा तालुक्याचे राजकारण आजवर गटातटाचे होते, याला छेद देत पक्षीय राजकारण गणेश चिवटे यांनी मोठ्या ताकदीने रूजवले आहे. त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन अनेक महत्वपूर्ण लोकप्रतिनिधीचे भाजपामध्ये प्रवेश होत आहेत. या त्यांच्या सर्व कामाच्या पार्श्वभूमीवर त्यांचा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेला सत्कार महत्वपूर्ण मानला जात आहे. गणेश चिवटे यांना भविष्यात पक्ष संघटना कोणती ताकद आणि जबाबदारी देणार; यावर करमाळा माढा विधानसभा मतदार संघातील लोकांचे लक्ष लागून आहे.


गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामुक्त व्हा...
आता जुन्या बॅटरी वापरा नव्यासारख्या !
महाराष्ट्रात प्रथमच...
२ चाकी ३ चाकी ४ चाकी ट्रक ट्रॅक्टर JCB पोकलेन सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.


# भाजपाचे सुपर वॉरियर्स म्हणजे पक्षाचे भावी नेतृत्व : प्रशांत परिचारक




करमाळा(सं.प्र.) : भाजपाचे सुपर वॉरियर्स म्हणजे पक्षाचे भावी नेतृत्व आहे; असे प्रतिपादन भाजपाचे माढा लोकसभा प्रभारी माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी केले.

भाजपाचे जिल्हा सरचिटणीस तथा करमाळा विधानसभा निवडणूक प्रमुख गणेश चिवटे यांनी आयोजित केलेल्या सुपर वॉरिअर्स बैठकीत ते बोलत होते.

पुढे बोलताना श्री.परिचारक म्हणाले, की भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच भाजपाचे सर्व आमदार, खासदार, जि.प.सदस्य, पं.स.सदस्य याशिवाय माझ्या सह सर्व नेते आज सुपर वॉरियर्स म्हणून काम करत आहेत. त्यामुळ आजचे हे सर्व वॉरियर्स म्हणजे भावी नेते आहेत. आत्ताच राजस्थान, छत्तीसगढ व मध्यप्रदेश मध्ये भाजपाने यश संपादन केले आहे. यामध्ये बुथ कमिट्या व त्या मार्फत केलेले नियोजन यांचा सिंहाचा वाटा आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष केदार सावंत यांनी वॉरियर्स यांनी पक्षाच्या सूचनेनुसार गावागावात सुक्ष्म नियोजन करावे. राज्य व केंद्र सरकारने अनेक लोकपयोगी कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत, त्याचा लाभ तालुक्यातील हजारो लोकांना होत आहे. या योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करावा; असे आवाहन केले.

यावेळी गणेश चिवटे म्हणाले, की करमाळा माढा विधानसभा क्षेत्रातील सुपर वॉरियर्स, बुथ समित्या व इतर कमिट्या आपण सशक्त करत असून याद्वारे सर्व निवडणुकीत भाजपची ताकद पक्षाच्या आदेशाप्रमाणे वाढवणार आहोत. याप्रसंगी जि.प.सदस्य शिवाजी कांबळे, माजी जिल्हा सरचिटणीस किरण बोकन, उपसरपंच अमोल पवार, जिल्हा चिटणीस विनोद महानवर, तालुका उपाध्यक्ष रामा ढाणे, जिल्हा उपाध्यक्ष पै.अफसर जाधव, व्यापारी आघाडीचे जितेश कटारिया, लक्ष्मण केकान, करंजेचे सरपंच काका सरडे यांच्यासह भाजपाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांचे आभार महानवर यांनी मानले.


आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२




गीर गाईचे प्युअर दुध मिळेल.
मो.9822058106



इथं सौंदर्य जन्म घेतं..
मो.9172092187
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा
होलसेल साडी डेपो
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
दिवाळीनिमित्त खास ऑफर...
लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
ॲड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट) मो.7387832186
घरगुती विक्रीसाठी साड्या होलदरात मिळतील



देशभक्त
हार्दिक शुभेच्छा
माजी नगराध्यक्ष
माजी उपनगराध्यक्ष
युवा नेते
माजी आमदार
12 डिसेंबर
मा.श्री. जयवंतरावजी जगताप साहेब
सभापती, करमाळा कृषी उ.बा.समिती/माजी आमदार
आपणांस वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक
महात्मा गांधी ज्यु.कॉलेज ऑफ सायन्स, करमाळा.
श्री.पी.ए.कापले (प्राचार्य)
श्री.ए.एच.बागवान (उप-प्राचार्य)
श्री.बी.के.पाटील (पर्यवेक्षक)
सौ.सुनिता नवले (पर्यवेक्षिका)
प्रा.व्ही.एल.पवार (विभागप्रमुख)
प्रा.यु.डी.पाटोळे, प्रा.एस.बी.कन्हेरे, प्रा.पी.ई.सागडे, प्रा.एम.पी.झालटे
प्रा.सौ.एस.ए.बुद्रूक, प्रा.डी.बी.भागडे, प्रा.एस.एन.नलवडे, प्रा.जे.एन.चौरे, प्रा.एम.पी.थोरात
प्रा.पी.जे.जाधव, प्रा.बी.एस.इबितदार, प्रा.एच.ए.निंबाळकर, प्रा.डी.पी.लावंड
प्रा.संग्राम दयाळ, प्रा.एस.बी.जाधव, प्रा.के.जी.कुसकर, प्रा.एम.डी.पाटोळे,
सौ.एस.बी.घळके, प्रा.डी.के.दळवे, एम.बी.चोरगे (प्रयोगशाळा परिचारक)


देशभक्त
आशिर्वाद
आशिर्वाद
12 डिसेंबर
कृ.उ.बा.स.चे सभापती व माजी आमदार
मा.जयवंतराव जगताप
आपणांस वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
गजानन स्पोर्टस् ॲन्ड सोशल क्लब
वेताळपेठ, करमाळा.
श्री.प्रशांत ढाळे
(मा.नगराध्यक्ष)


देशभक्त
मा.नगराध्यक्ष
युवा नेते
तत्वनिष्ठ नेता व माजी आमदार
मा.जयवंतराव जगताप साहेब
आपणांस वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
12 डिसेंबर
श्री.बाळकृष्ण पाटील सर
पर्यवेक्षक, म.गांधी विद्यालय
सदस्य, कुंभारगाव सोसा.
सौ.आशा बाळकृष्ण पाटील
डॉ.ऋषीकेश बाळकृष्ण पाटील
M.B.B.S
शुभेच्छुक
पाटील परिवार, केत्तूर/करमाळा
डॉ.स्नेहल ऋषीकेश पाटील
B.A.M.S
डॉ.ऋतुजा तेजस नाईक(पाटील)
B.A.M.S


किंगमेकर व माजी आमदार
मा.जयवंतरावजी जगताप(साहेब)
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
माजी सरपंच
दादासाहेब जाधव
सदस्य, ग्रा.पं.रावगाव
श्री.भाऊसाहेब बुधवंत सर
शुभेच्छुक
भाऊसाहेब बुधवंत मित्र परिवार, रावगांव


12 डिसेंबर
कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व माजी आमदार
मा.श्री.जयवंतराव जगताप साहेब
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
सचिव
शुभेच्छुक
● मोरवड विविध कार्य.सेवा सह.संस्था मर्या; मोरवड
● कंदर विविध कार्य.सेवा सह.संस्था मर्या; कंदर
● वरकटणे विविध कार्य.सेवा सह.संस्था मर्या; वरकटणे
(संचालक व सर्व सभासद)
श्री.दादासाहेब लक्ष्मण जाधव


लोकप्रिय आमदार
का.संचालक, भैरवनाथ शुगर
लोकनियुक्त सरपंच, वाशिंबे
उद्योजक
करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व माजी आमदार
श्री.जयवंतरावजी जगताप साहेब
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
श्री.भरत आवताडे
श्री.नानासाहेब मोरे
शुभेच्छुक
गुरुदत्त एंटरप्रायजेस् करमाळा., जि.सोलापूर

# तालुक्याच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी आ.शिंदे सोबत कायम राहणार : जयवंतराव जगताप

## साडे येथे दहिगाव उपसा सिंचन योजनेवरील बंद नलिका वितरण प्रणालीचे भुमीपूजन





करमाळा(सं.प्र.) : तालुक्याच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत आमदार संजयमामा शिंदे यांनाच निवडून द्या. मी त्यांच्याबरोबर कायम राहणार असून, तुम्ही त्यांची साथ सोडू नका; असे आवाहन माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी केले आहे.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे अंतर्गत दहिगाव उपसा सिंचन योजनेवरील बंद नलिका वितरण प्रणालीचे भुमीपूजन साडे येथे झाले. यावेळी आमदार संजयमामा शिंदे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, वाशिंबेचे सरपंच तानाजी झोळ, मांगी सोसायटीचे चेअरमन सुजित बागल, घोटीचे सरपंच विलास राऊत, अधिक्षक अभियंता धीरज साळी, निंभोरेचे सरपंच रविंद्र वळेकर, बबनराव मुरुमकर, कार्यकारी अभियंता एम.टी.जाधवर आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री.जगताप म्हणाले, की सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरण उभारणीत स्व.नामदेवराव जगताप यांचा मोठा वाटा आहे. या योजनेसाठी मी आमदार असताना प्रयत्न केले. स्व.दिगंबरराव बागल, त्यानंतर माजी आमदार शामल बागल, माजी आमदार नारायण पाटील यांनीही प्रयत्न केले. मात्र तालुक्यातील राजकीय विरोधामुळे हे काम रखडले. आ.शिंदे यांच्या प्रयत्नामुळे हे काम पूर्णत्वास आले असून तालुक्याचा विकास करण्यासाठी मी त्यांच्याबरोबर आहे. यापुढेही त्यांच्याबरोबर कायम राहणार असून, तुम्हीही साथ द्या; असे आवाहन केले. दरम्यान करमाळा तालुक्याचा विकास करण्यासाठी मी कधीच कमी पडणार नाही; असे आश्वासन आ.शिंदे यांनी दिले आहे.

कुकडी डावा कालवाचे उपकार्यकारी अभियंता एस.के.आवताडे यांनी प्रास्ताविकात योजनेची माहिती दिली. यावेळी देविदास ताकमोगे, विलास राऊत, तानाजी मस्कर यांचेही भाषण झाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संजय साखरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ.विकास वीर यांनी मानले.

# उजनी धरणात १० टीएमसी पाणी सोडावे

## उजनी धरणग्रस्त समितीचे निवेदन

करमाळा(सं.प्र.) : उजनी धरणातील पाणी पातळी वरचेवर खालावत असल्याने भविष्यातील अडचणी डोळ्यासमोर दिसत असल्याने उजनी धरणात वरील धरणातील १० टीएमसी पाणी सोडण्यात यावे; अशा मागणीचे निवेदन उजनी धरणग्रस्त समितीच्या वतीने तहसीलदार यांना देण्यात आले. यावेळी बोलताना उजनी धरणग्रस्त संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रा.शिवाजी बंडगर म्हणाले, की उजनी धरणासाठी आमची गाव, घरेदारे, जमीन जुमला या सर्व गोष्टीचा त्याग केला आहे. असे असताना आमचे हक्काचे पाणी आम्हाला मिळत नाही. आमच्या हक्काचे १२ टीएमसी पाणी आम्हाला सुरळीतपणे मिळायला पाहिजे. यावर्षी पाऊस कमी झाला असून उजनी धरण केवळ ५६ टक्के भरले आहे. सव्वा दिन महिन्यात याच पाण्यातील पाणी वारेमाप सोडले गेले. त्यामुळे आज केवळ २५ टक्के पाणी शिल्लक आहे. उरलेल्या सहा सात महिन्यात यापेक्षा वाईट परिस्थिती होणार आहे. पुढील संकटाची चाहुल लागल्याने धरणग्रस्तांनी आज उजनीच्या धरणातून १० टीएमसी पाणी सोडण्याची प्रमुख मागणी केली आहे. यावेळी भारत साळुंके, धनंजय डोंगरे, केरू गव्हाणे, चंद्रकांत सरडे, धुळा कोकरे, बापूराव देशमुख, राजाभाऊ धांडे, सचिन पिसाळ, नंदकुमार भोसले, अजित रणदिवे, संतोष वारे, देवा ढेरे, बापूराव रणसिंग, डॉ.गोरख गुळवे, दत्ता देशमुख, राजकुमार देशमुख, अर्जुन तकीक, संदीप यादव आदी शेतकरी बांधव उपस्थित होते.

बार्शी येथील सुप्रसिध्द न्युरोसर्जन
**डॉ.किशोर उध्दवराव गोडगे**
MBBS.MS.Mch (neurosurgeon)
**शेलार हॉस्पिटल, करमाळा येथे उपलब्ध !**
**रविवार दि.१०/१२/२०२३ सकाळी १० ते १२**
उपलब्ध सुविधा
- म.ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचार
- कंबरदुखी, पायदुखी, डोकेदुखी
- जन्मजात व्यंग व उपचार
- हातपायाला मुंग्या येणे
- मेंदूमध्ये रक्तस्त्राव उपचार
- लहान मुलांचे मेंदूचे उपचार
- बिनटाक्याची मणक्याची शस्त्रक्रिया
- दुर्बिणीद्वारे मेंदू व मणक्याची शस्त्रक्रिया
- अर्धांगवायु उपचार

● कर्मवीर जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी ● साई सुपरस्पेशालिटी सेंटर, बार्शी
बाळेश्वर नाका, यादव हॉस्पिटल शेजारी, बार्शी
संपर्क : 7620161520 / (02182) 220111

**श्री गजानन अगरबत्ती**
- सुगंधी अगरबत्ती ● कापूर
- अत्तर ● धूप ● भीमसेन कापूर,
- विविध कलरची रांगोळी
- सर्व प्रकारचे लोबन,
- सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !





पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

## सावधानतेची नोटीस

तमाम करमाळा तालुक्यातील विशेषत: खांबेवाडी येथील नागरीकांना कळविण्यात येते की, मौजे खांबेवाडी येथील जमीन गट नं.११५/२ मध्ये आमचे अशिल व रामा भिका टकले यांचे नावावर समाईक ०१ हे. १२ आर, पो.ख. ०० हे. ०८ आर, एकूण ०१ हे. २० आर मिळकत आहे. असे असलेतरी सदरची मिळकत आमचे अशिल ही मिळकत सन २००० पासून वहिवाट करत आहेत. सन २००३ मध्ये यातील रामा भिका टकले यांनी आमचे अशिलास वहिवाटीस हरकत केली होती. परंतु आमचे अशिलाने ती हरकत न जुमानता सदर दावा मिळकतीतील कब्जा कायम ठेवला असून त्यांची दावा मिळकतीत शांततामय मार्गाने कब्जा वहिवाट आहे. एवढेच नाहीतर ते विरूध्द कब्जाने दावा मिळकतीचे मालक झाले आहेत. असे असताना अलिकडे १० नोव्हेंबर २०२३ पासून रामा भिका टकले यांचे सातबारा उताऱ्यावर नाव असल्याचा गैरफायदा घेऊन सदरची मिळकत विक्री करण्याची भाषा करत आहेत. सबब सदर मौजे खांबेवाडी येथील जमीन गट नं.११५/२ मधील मिळकतीचे आमचे अशिल विरूध्द कब्जाने मालक झाले आहेत. सबब रामा भिका टकले यांचे बरोबर कोणीही कोणताही हस्तांतरणाचा व्यवहार करू नये. तसा व्यवहार झाला तर तो पूर्णत: बेकायदेशीर होईल. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सदरची जाहीर नोटीस दिली. ता.७/१२/२०२३

**साखरबाई विष्णु महानवर** तर्फे
**डॉ.ॲड.बाबूराव तुकाराम हिरडे**
एम.ए.पी.एचडी.एलएल.बी. एम.सी.जे.
ॲडव्होकेट, वेताळपेठ, करमाळा.

**श्री.नितीन ब. गपाट**
बी.ए.एलएल.बी. **ॲडव्होकेट**
करमाळा, जि.सोलापूर

## जाहीर नोटीस

(सिलींग जमीन पूर्वपरवानगीने विक्री करणेसाठीचा नमुना)

या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे वडशिवणे, ता.करमाळा येथील शेतजमीन गट नं.१७६/२, क्षेत्र ० हे. ९१ आर, पो.ख. ० हे. ०९ आर असे एकूण क्षेत्र १ हे. ०० आर, आकार ० रू. ३५ पैसे ही मिळकत श्री.रामचंद्र संभा दणाणे रा.वडशिवणे, ता.करमाळा, जि.सोलापूर यांचे मालकी वहिवाटीची आहे. सदरची जमीन त्यांना शासनाकडून महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ अंतर्गत मिळालेली आहे. त्यांनी सदर जमीन आमचे अशिल श्री.ओंकार महेंद्र पाटील रा.बिटरगाव(वां), ता.करमाळा, जि.सोलापूर यांना खरेदी देणेसाठी पूर्वपरवानगी मिळणेकामी मा.अपर जिल्हाधिकारी, सोलापूर (कुळकायदा शाखा) या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे. तरी उक्त नमूद शेतजमीनीबाबत व त्यामध्ये झालेल्या व्यवहाराबाबत किंवा इतर कुठल्याही प्रकारचे व्यवहारांबाबत किंवा उक्त जमिनीबाबत कोणाचाही करार, लिज, भाडेपट्टा, पोटगीहक्क, वारसाहक्क, बोजा, गहाण, दान, लिन, कर्ज, कोर्ट केसेस, मृत्युपत्र, खरेदी विक्री, साठेखत, पतसंस्थेचा बोजा, सावकारी देणे-घेणे इ. बाबत काही हरकत/तक्रार/हितसंबंध/अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत मा.अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर (कुळकायदा शाखा), सिध्देश्वर पेठ, सोलापूर. ४१३००१ या पत्त्यावर आपली हरकत नोंदवावी. सदर कालावधीत कोणतीही हरकत प्राप्त न झालेस या संदर्भात कोणाचीही हरकत नाही असे समजून उक्त शेतजमीनीचा खरेदी/विक्री व्यवहाराच्या पूर्वपरवानगीबाबत पुढील कार्यवाही करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

ता.७/१२/२०२३

**अशिला तर्फे ॲडव्होकेट**





करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती
सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक व माजी आमदार

मा.श्री.
# जयवंतराव जगताप साहेब

आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख..

## हार्दिक शुभेच्छा..

12 डिसेंबर

शुभेच्छुक

# सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

### करमाळा शाखा
पी.के.शिंदे (सिनिअर बँक इन्स्पेक्टर, करमाळा तालुका)
ए.आर.आवटे (शाखाधिकारी), एस.के.रासकर (बँक इन्स्पेक्टर)
**क्लार्क** – एस.डी.सपकाळ, एन.ए.सुर्यवंशी, एस.बी.चव्हाण
**सेवक** – एस.व्ही.भिल्लारे, बी.जी.इंदुरे, एम.एम.खंडागळे, सागर शिंदे

### कोर्टी शाखा
के.डी.कदम (शाखाधिकारी), ए.एस.वाघमोडे (बँक इन्स्पेक्टर)
श्री.ठोंगे (क्लार्क), डी.एच.काळे (सेवक)

### पारेवाडी शाखा
डी.एस.गोरे (शाखाधिकारी), एन.जी.मुटके (बँक इन्स्पेक्टर)
ए.आर.तनपुरे (क्लार्क)

### टाकळी शाखा
आर.पी.बिबे (शाखाधिकारी), सौ.एस.एम.बनसोडे (क्लार्क)

### करमाळा शहर शाखा
एन.एच.बागवान (शाखाधिकारी), एम.जे.शिंदे (बँक इन्स्पेक्टर)
आर.जी.वायचळ (क्लार्क), ए.एस.जाधव (सेवक)

### मांजरगाव शाखा
डी.टी.पवार (शाखाधिकारी), एस.जे.धुमाळ (क्लार्क)
एस.आर.जाधव (सेवक)

### जेऊर(क) शाखा
व्ही.बी.पाटील (शाखाधिकारी), एम.डी.नगरे (बँक इन्स्पेक्टर),
बी.जी.ढावणे (क्लार्क), आर.आर.पाटील (सेवक), गणेश कुलकर्णी, ए.आर.लवळे

### चिखलठाण शाखा
एच.एन.जाधव (शाखाधिकारी), आर.के.साळुंके (क्लार्क)
यु.यु.पोळ (सेवक)

### वांगी नं.3 शाखा
ए.टी.वजाळे (शाखाधिकारी), एस.एम.शिंदे (बँक इन्स्पेक्टर)
एस.एन.परदेशी (क्लार्क), तानाजी रोकडे (सेवक)

### साडे शाखा
आर.इ.हेंबाडे (शाखाधिकारी), ए.व्ही.हुलगे (बँक इन्स्पेक्टर)
आय.एस.इनामदार (क्लार्क), विकास दुधे (सेवक)

### कंदर शाखा
श्री.निकम(शाखाधिकारी), श्री.खुने (क्लार्क), रामलिंग कुंभार (सेवक)

### केम शाखा
सौ.एस.व्ही.गाडे (शाखाधिकारी), ए.डी.राऊत (क्लार्क)
डी.व्ही.राठोड (क्लार्क)

### गौंडरे शाखा
श्री.उमरदंड (शाखाधिकारी) श्री.घाडगे (बँक इन्स्पेक्टर)
एन.डी.काळे (क्लार्क), ए.डी.पवार (सेवक)

# नामसाधना विद्यामंदिरास जिल्हास्तरीय उपक्रमशील शाळा पुरस्कार प्रदान




करमाळा(सं.प्र.) : करमाळा नगरपरिषदेच्या नामसाधना प्राथमिक विद्यामंदिर सेंट्रल स्कुल मुले नं.१ या शाळेला पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेचा जिल्हास्तरीय कर्मवीर भाऊराव पाटील उपक्रमशील शाळा पुरस्कार माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांचे उपस्थितीत प्रदान करण्यात आला. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका व सर्व उपस्थित उपशिक्षकांना सन्मानित करण्यात आले. मुख्याधिकारी बालाजी लोंढे, प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, केंद्रसमन्वयक दयानंद चौधरी, लिपीक शिवदास कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली नामसाधना विद्यामंदिर सेंट्रल स्कुल मुले नं.१ या शाळेचे उत्कृष्ट शैक्षणिक कामकाज चालू आहे. पहिली ते पाचवी गटातील जिल्ह्यातील फक्त मुलांची सर्वाधिक पटाची शाळा या शाळेची ओळख असून, या शाळेने क्रिडा नैपुण्य, वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, अनेकवेळा न.पा.चा स्वच्छ शाळा-सुंदर शाळा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळवला आहे. तसेच शिष्यवृत्ती , नवोदय, आयटीएस, एटीएस, एमटीएस, बुध्दीवंत अशा विविध स्पर्धा परीक्षेत शाळेने गुणवत्ताधरक विद्यार्थी घडवले आहेत. लोकसहभाग, डिजीटल शाळा, आयएसओ मानांकन प्राप्त शाळा. आजपर्यंत अनेक संस्थांचे तालुका, जिल्हा व राज्य पुरस्काराने सन्मानित केली गेली आदर्श शाळा म्हणून या शाळेचा लौकीक आहे. बालदिंडी, आनंदी बाजार, दिपोत्सव, दहिहंडी, शैक्षणिक सहल, शंभर टक्के पटनोंदणी असे अनेक उपक्रम राबविणारी शाळा आदी बाबीची दखल घेऊन या शाळेला जिल्हास्तरावरील उपक्रमशील शाळा पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. शाळेला मिळालेल्या या पुरस्काराबद्दल शाळा व्यवस्थापन समिती, आजी-माजी नगराध्यक्ष, नगरसेवक, अधिकारी यांनी मुख्याध्यापिका सुनंदा जाधव, उपशिक्षक कोकीळ, शेरे, उपशिक्षिका शितोळे, भैलुमे, उपळेकर, अभंगराव, जगताप, गलांडे, केवडकर, कांबळे, ठाकरे यांचे अभिनंदन केले.





## पाहिजेत

पतसंस्था व इतर कार्यालयातील कामकाजासाठी
**कॉम्प्युटर ऑपरेटर** व **अकौंटंची** नेमणूक करणे आहे.
गरजूंनी त्वरीत संपर्क साधावा.

**संपर्क : मो.नं.9421063921, 9146724012**


# श्रीराम प्रतिष्ठानच्या वतीने सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळा

## नावनोंदणी करण्याचे गणेश चिवटे यांचे आवाहन

करमाळा(सं.प्र.) : श्रीराम प्रतिष्ठानच्या वतीने ४ फेब्रुवारी २०२३ रोजी सायंकाळी ६ वा. १७ मिनीटांनी सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या विवाह सोहळ्यात ज्यांना आपल्या पाल्याचे नाव नोंदवायचे आहे; अशांनी १८ नोव्हेंबर २०२३ ते २५ जानेवारी २०२४ या कालावधीत नावनोंदणी करावी; असे आवाहन श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष गणेश चिवटे यांनी केले आहे.

याबाबत माहिती देताना श्री.चिवटे म्हणाले, की या सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळ्यात वधू-वराचे हळदीचे व विवाहाचे कपडे, बुट व चप्पल, वधू-वराच्या मामांना मानाचा आहेर म्हणून टॉवेल टोपी, वरासाठी फेटा व शाल देण्यात येईल. तसेच वधुसाठी लाल चुनरी दिली जाईल. तसेच वधु-वरासाठी मंडवळ्या, वधुसाठी मनी मंगळसुत्र, जोडवे, बिचवे, हार-फुले-गजरे, मेकअप साहित्य, संसारपयोगी भांडी सेट मोफत दिली जाणार आहेत. वधू-वराची करमाळा शहरातून सवाद्य मिरवणूक देखील काढण्यात येणार आहे. तसेच वऱ्हाडी मंडळीच्या भोजनाची सुविधा सकाळी ११ ते सायंकाळी ५ पर्यंत करण्यात आली असून मेकअप व इतर सुविधासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. विवाहस्थळी भव्य मंडप व डेकोरेशन करण्यात येणार असून येणाऱ्या वऱ्हाड्यांच्या गाडी लावण्याची स्वतंत्र पार्किंगची सोय केली जाणार आहे. विवाहात नाव नोंदणीसाठी वधू व वर पक्षाकडून एक हजार रू. शुल्क घेतले जाणार आहे. तरी वर, वधूच्या नावनोंदणीसाठी पालकांनी संजय किरवे (७२१८७५७६८५), प्रमोद फंड (९४२१०६३९२१), संतोष जवकर (९४२२६२७९६६) येथे संपर्क साधावा.


9158728500 / 8855885578

## मराठा मंदीर डेकोरेशन

- लग्न समारंभ
- साखरपुडा
- नामकरण
- मुंजविधी
- मंदिर डेकोरेशन
- डोहाळजेवण
- गेट टुगेदर
- वाढदिवस
- बेबी वेलकम
- उद्घाटन सोहळा
- कार डेकोरेशन
- सत्कार समारंभ

**लग्न समारंभ डेकोरेशन सेटअप**

- भव्य २०० प्रकारचे लग्नाचे सेट
- हळदीसाठी १०० सेट उपलब्ध
- मेहंदीसाठी २५ सेट उपलब्ध
- नवरा-नवरीसाठी आकर्षक बंगी
- आकर्षक वेलकम गेट
- मागणीनूसार राजवाडा स्टेज
- ६० फुट लांबीचा ओपन ग्राऊंड स्टेज सेटअप उपलब्ध
- सर्व प्रकारच्या लाईट-LED/माळा/फोकस
- पायरो फटाका/स्मोक क्राऊन एन्ट्री

**वाढदिवस डेकोरेशन सेटअप**

ONE नाव, बलून डेकोरेशनल, सोफा सेट कार्टून सेटअप, फ्लोअर पॉट, स्टेज कार्पेट, लहान मुलांसाठी बंगी, वेलकम गेट, LED लाईट, लाईटमध्ये Happy Birthday नाव
प्रशस्त स्टेज- १२ x १६, १६ x १६, २० x १२

**नामकरण समारंभ डेकोरेशन सेटअप**

चंद्र सेटअप पाळणा/राजस्थानी, महाराष्ट्रीयन पाळणा डिजीटल बोर्ड फोटो, कार्टून डिझाईन, वेलकम गेट बलुन डेकोरेशन, बाळासाठी बंगी एन्ट्री, माझे नांव का ?/शंखामध्ये नांव/लखोटामध्ये नांव
प्रशस्त स्टेज- १२ x १६, १६ x १६, २० x १२

**डोहाळ जेवण डेकोरेशन सेटअप**

झोपाळा-१, चंद्र-१, हरीण डेकोरेशन-२ डिजीटल बोर्ड फोटो-१, झुंबर-३, कार्टून-२ 'कुणी तरी येणार गं-लाईटिंग नाव, पिसाऱ्यातील मोर, स्टेजवरील सोफा
प्रशस्त स्टेज (२० x १२, २० x १६)

**मुंज विधी डेकोरेशन सेटअप**

ऋषीमुनी सेटअप, बटू कार्टून, वेलकम गेट भव्य स्टेज (२० x २०), सोफा सेट, पूर्ण कार्पेट, मातृ भोजन सेट, मोर डेकोरेशन बलुन डेकोरेशन, डिजीटल बोर्ड फोटो सेट

सर्व शुभकार्यासाठी **'मराठा मंदिर डेकोरेशन'** सज्ज आहे !

प्रोप्रा : अनिल रेगुडे (9158728500 / 8855885578)

# विद्यार्थी संघटना ते सरपंच

## रविंद्र वळेकर यांचा प्रवास



विद्यार्थीदशेपासूनच राजकारण व समाजकार्याची आवड असलेले निंभोरे येथील लोकनियुक्त सरपंच रविंद्र अंकुश वळेकर यांचा विद्यार्थी संघटना ते सरपंच असा राजकीय प्रवास झाला आहे. निंभोरे गावच्या ग्रामपंचायत इतिहासात ते सर्वात कमी वयाचे व सुशिक्षित सरपंच होण्याचा मान त्यांना मिळाला आहे. या निवडणुकीत एकाच वेळी दोन सख्खे भाऊ निवडून आले असून एक सरपंच तर एक उच्च शिक्षित सदस्य निवडला आहे. आमदार संजयमामा शिंदे यांच्या सहकार्याने सरपंच पदाच्या मिळालेल्या संधीचा फायदा गावाच्या विकासासाठी करून घेऊन निंभोरे गावामध्ये जास्तीत जास्त निधी आणून करमाळा तालुक्यात एक आदर्श गाव निर्माण करण्यासाठी आपला प्रयत्न राहील. असा आत्मविश्वास निंभोरे गावचे नूतन सरपंच रविंद्र वळेकर यांनी सा.संदेशशी बोलताना व्यक्त केला आहे.

आपल्या वाटचालीबद्दल ते सा.संदेशशी बोलत होते. पुढे बोलताना श्री.वळेकर म्हणाले, की आमच्या वळेकर घराण्यात माझे आजोबांपासून राजकीय वारसा आहे. तेव्हापासून ते आत्तापर्यंत आमच्या घराण्यात सोसायटीची सत्ता आमच्याकडेच राहिली आहे. देशभक्त स्व.नामदेवराव जगताप यांचेपासून आम्ही जगताप गटाचे समर्थक आहोत. त्यानंतर माजी आमदार जयवंतराव जगताप यांचेही आम्ही समर्थक राहिलो आहोत. परंतु २०१४ नंतर आमदार संजयमामा शिंदे यांची करमाळा तालुक्यात एन्ट्री झाल्यानंतर मी शिंदे समर्थक म्हणून राजकीय वाटचाल चालू केली आहे.

श्री.वळेकर यांचे उच्च शिक्षण येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात झाले असून सुरूवातीला त्यांनी यु.आर पदाची निवडणूक लढवली होती. त्यामध्ये ते निवडून आले होते. तेव्हापासूनच निवडणुकीची व राजकारणाची आवड निर्माण झाली आहे. यु.आर असताना युवकांचे संघटन करून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यावेळी प्रयत्न केले आहे. राष्ट्रीय स्टूडन्टस् युनियन ऑफ इंडिया या विद्यार्थी संघटनेवर सलग तीन वेळा निवड झाली आहे. या संघटनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. आमदार संजयमामा शिंदे यांचा करमाळा तालुक्यात राजकीय प्रवास चालू झाल्यानंतर राष्ट्रवादी पदवीधर संघटनेच्या तालुका अध्यक्ष पदी त्यांच्या माध्यमातून निवड झाली. या पदावर सलग तीन वर्षे काम केले आहे. सन २००७ मध्ये विद्यार्थ्यांसाठी बससेवा नसल्याने जेऊर ते निंभोरे या मार्गावर कॉलेजच्या वेळेनुसार बससेवा सुरू केली. निंभोरे गावात २०११ पर्यंत एसटीची कसलीच सोय नव्हती. त्यावेळी आमदार प्रणिती शिंदे यांचेकडे गावात एसटी मिळावी म्हणून पाठपुरावा केला व त्यांच्या माध्यमातून निंभोरे गावाला एसटी चालू झाली. सन २०१७ साली मामा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झाल्यानंतर निंभोरे गावातील समस्या सोडविण्यासाठी खऱ्या अर्थाने संधी मिळाली. त्यांचेकडे पाठपुरावा करून गावातील खंडेश्वर मंदिराचा सभामंडप मंजूर होऊन मंदिराचे सर्व काम झाले. तसेच फरतडे वस्ती येथील पाझर तलावाखालील शेतकऱ्यांना २ कोटी ८५ लाख रू. मिळवून दिले. कोंढेज रस्त्यासाठी ३ कोटी ३२ लाखाचा रस्ता मंजूर केला. तसेच गावासाठी आमदार फंडातून ३.५० लाख रूपयाचे बसस्थानक मिळाले. आमदार फंडातून सभामंडप, केम ते नारनवर वस्ती रस्ता मुरमीकरणाचे काम केले. मराठी शाळेसाठी दोन वर्गखोल्या, स्मशानभुमीचे काम, सहा हायमास्ट दिवे, दलित वस्ती मधील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे, ग्रामपंचायत कार्यालय जवळील रस्ता, आंब्याचा मळा ते फरतडे वस्ती रस्ता आदी विकासकामे केलेली आहेत. याबरोबरच नेत्ररोग शिबीर घेऊन मोफत चष्मे वाटप व डोळ्यांचे ऑपरेशनसाठी मदत केली आहे. याबरोबरच रक्तदान शिबीर, वृक्षारोपण आदी सामाजिक उपक्रम राबविले आहेत.

कोरोना काळात लसीकरणासाठी जनजागृती करून नागरीकांना मदत केली आहे. त्यामुळे शासनाचा कोविड योध्दा हा पुरस्कार मिळाला आहे. तसेच सामाजिक कार्याबद्दल टाईम्स टू डे यांचा राज्यस्तरीय सामाजिक पुरस्कार मिळाला आहे. गावात पाणी टंचाई जाणवत असल्याने सिनेअभिनेते अमीर खान यांचा पाणी फाऊंडेशनचा उपक्रम गावात राबवून जनजागृती केली आहे. या फाऊंडेशन मार्फत ग्रामस्थांच्या सहकार्याने ओढा खोलीकरण करणे, झाडे लावणे, ग्रामस्थांना पाण्याचे महत्व पटवून देणे यासाठी अधिकारी व ग्रामस्थांच्या बैठका घेतल्या आहे. या कामाचे विशेष कौतूक म्हणून पाणी फाऊंडेशनचा गावाला तालुकास्तरीय दहा लाखाचा प्रथम पुरस्कार मिळाला आहे. ४६ बचत गटांना बँके मार्फत कर्ज प्रकरण मंजुरीसाठी त्यांना मदत केली आहे. या सामाजिक कामाबरोबरच नागरीकांचे गावातील वैयक्तीक वाद मिटविणे, पीक विमा भरणे, विविध प्रकारचे दाखले, रेशनकार्ड काढणे, शासकीय अनुदान मिळवून देणे, निराधारांना मदत करणे, पेन्शनसाठी व घरकुल मिळवून देण्यासाठी मदत करणे. याबरोबरच शौचालय व शोषखड्ड्यासाठी ग्रामस्थांमध्ये जागृती करून त्यांना अनुदान मिळवून देणे आदी कामे केली आहेत. तसेच नागरीकांना तालुकास्तरावर न जाता गावातच ग्राहक सेवा केंद्राची स्थापना केली आहे. या केंद्रामार्फत बँक व्यवहाराबरोबरच विविध प्रकारचे अर्ज ऑनलाईन भरण्याची सुविधा केली आहे. या सर्व कामामुळे नागरीकांनी मला सरपंच पदाची संधी दिली आहे.

मार्च २०२३ मध्ये निंभोरे सोसायटीची निवडणूक जगताप व शिंदे गटा मार्फत लढवली. या निवडणुकीत आमच्या पॅनलला पूर्ण बहुमत मिळाले. त्यातून मला सदस्य होण्याची संधी मिळाली आहे. आता नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत जगताप व आ.शिंदे यांचे युतीला बहुतमत मिळाले असून या निवडणुकीत विरोधकांचे पाणीपत केले आहे. लोकनियुक्त सरपंच पदाच्या निवडणुकीत ३५१ मतांनी मी विजयी झालो आहे. तसेच उपसरपंच पदाची निवडणूकही बिनविरोध झाली आहे. आमदार संजयमामा शिंदे यांचे विश्वासू कार्यकर्ते म्हणून रविंद्र वळेकर यांची ओळख असून आमदार शिंदे यांच्याबरोबरच कायम राजकारणात सक्रिय राहण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. सरपंच पदाच्या माध्यमातून वीज, रस्ते व पाणी या सुविधा देण्यावर माझा भर राहणार आहे. त्याबरोबरच गावात प्राथमिक आरोग्य केंद्राची निर्मिती करणे, जनावरांचा दवाखाना करणे, ग्रामदैव खंडेश्वर क वर्गातून ब वर्गात आणण्याचा प्रयत्न करणे, विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासिका निर्माण करणे तसेच व्यायामासाठी जिमचे साहित्य उपलब्ध करून देणे, ग्रामपंचायतीसाठी नवीन सुसज्ज इमारत बांधणे, महिला सबलीकरणा-साठी व युवकांना व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मदत करणे, याबरोबरच गावातील चौकाचौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे इ. कामे आगामी काळात करण्याचा मनोदय रविंद्र वळेकर यांनी व्यक्त केला आहे.

## ग्रामायण भाग-३

हॉस्पीटलचे बांधकाम ठरले. मग पुढची तयारी सुरू झाली. त्यावेळी मोहोळ येथे चांगला चुना मिळतो हे समजले. त्यामुळे मी स्वत:च चक्क ट्रक घेऊन मोहोळला गेलो व तेथून ट्रकभर चुना आणला. त्याचा विपरीत परिणाम झाला तो म्हणजे माझे व दोन कामगाराचे डोळे लाल झाले आणि खुपू लागले. त्यावेळी जेऊरला पाण्याची सोय नव्हती. पुणे जवळील हडपसर येथील साने गुरूजी संस्थेकडे बोअर घेणारी मशीन होती; पण ते जेऊरला येण्यास तयार नव्हते. त्यावेळी माझे ऑर्थोचे चौधरी सर कामाला आले. त्यांनी मदत केली व त्यांच्या सुचनेवरून मशीन आली व बोअर घेतले. त्या बोअरवर हापसा बसवला. पहाटे ५ वाजता मी तर कधी बी.जे.ला असलेला माझा धाकटा भाऊ दोघे हापसा हापसून पाणी काढत असत व बांधकामावर पाणी मारत असे. पहाटे कामगार येत नसत, त्यामुळे आम्हालाच पाणी मारावे लागत असे. पुढे त्यावर जेट पंप बसवला पण वीज नसे. त्यामुळे १० एच.पी. चे डिझेल इंजीन घेतले व ते जोडून पाणी काढत असे. यातही अडचण म्हणजे जेटची साखळी निसटायची . यासाठी शेगडा, चेन पाने विकत घेतले व ते आम्हालाच करावे लागे. त्यावेळी जोडणी करणारे कुशल कामगार नव्हते. मी त्यावेळी शेगडा लावून दोन कामगार घेऊन दोन इंची पाईप बाहेर काढत असे. निसटलेले रॉड जोडत असे. त्यातही मी तरबेज झालो. विशेष म्हणजे १०० ते १५० ची ओपीडी पाहून चालायचे. हा एक अविस्मरणीय अनुभव...!

...डॉ.सुभाष सुराणा, जेऊर
मो.नं.८९७५५४९०६०

सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू. भरून वर्षभर घरपोच अंक मिळवा

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना श्रीजय नेत्र रूग्णालय
डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A
करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.
वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध
श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३



कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, तालुक्याचे किंगमेकर व माजी आमदार
मा.जयवंतराव जगताप साहेब
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
12 डिसेंबर
मा.नगरसेविका
श्रीमती शारदा राखुंडे
मा.उपाध्यक्ष, वकील संघ
ॲड.नवनाथ राखुंडे
शुभेच्छुक
कानाडगल्ली मित्र परिवार करमाळा.




माजी आमदार
मा.जयवंतराव(भाऊ) जगताप साहेब
आपणांस वाढदिवसानिमित्त...
हार्दिक शुभेच्छा !
ब्रह्मदेव राख
(माजी सरपंच)
शुभेच्छुक
ब्रह्मदेव राख मित्र परिवार, लिंबेवाडी
ग्रामपंचायत, लिंबेवाडी (सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य)




प्रथम वर्षश्राध्द
स्व.राणीबाई दत्तूसिंग परदेशी
शुन्यामधूनी विश्व निर्मुनी
कीर्ती सुगंध वृक्ष फुलवूनी
लोभ, माया, प्रिती देवूनी
सत्य, सचोटी मार्ग दावून
अमर झाला तुम्ही जीवनी
स्व.राणीबाई परदेशी यांच्या
प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त
त्यांचे स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली !
पुण्यस्मरण दि.९/१/२०२३
वार/वेळ : शनिवार, सकाळी ११.०० वा.
स्थळ : स्वप्नपुर्ती हाऊस, बायपास रोड, राजयोग हॉटेल शेजारी, करमाळा.
शोकाकुल
• ठाकर व परदेशी परिवार, करमाळा.
• गोकुळ हॉस्पिटल स्टाफ, करमाळा.
• उपजिल्हा रुग्णालय, करमाळा.




कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती
सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक
व माजी आमदार
मा.श्री.जयवंतराव जगताप साहेब
आपणांस वाढदिवसाच्या... हार्दिक शुभेच्छा !
माजी नगराध्यक्ष
श्री.प्रशांत ढाळे
उद्योजक
श्री.बाळासाहेब बलदोटा
शुभेच्छुक
देशमुख कन्स्ट्रक्शन, करमाळा.

# चालत्या कारला टँकरची धडक
## कारसह मोटारसायकलचे नुकसान

करमाळा (सं.प्र.) : करमाळ्याहून नगरकडे जात असलेल्या क्रेटा या चारचाकीला पाठीमागून जाणाऱ्या टँकरने जोराची धडक दिली आहे. यात कारचे नुकसान झाले तसेच समोरून येणाऱ्या मोटारसायकलचेही नुकसान झाले आहे. हा अपघात ६ डिसेंबरला सायंकाळी सात वाजता मांगी पुलाजवळ घडला आहे. या प्रकरणी सुभाष पांडुरंग जाधव (रा.इसबावी, पंढरपूर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले,की आम्ही पंढरपूर येथून मध्यप्रदेशात जाण्यासाठी निघालो होतो. मांगीच्या पुलावर आलो असता, पाठीमागून येणाऱ्या टँकर क्र.एमएच.१५ डीके ११२९ चा चालक नामदेव एकनाथ जगताप (रा.श्रीरामपूर, नगर) यांनी जोराची धडक दिली. त्यात माझे कारचे नुकसान झाले आहे तसेच समोरून येणाऱ्या मोटारसायकललाही त्यांनी धडक दिली; परंतू मोटारसायकल स्वाराने उडी मारल्याने तो वाचला. त्यात मोटारसायकलचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी पोलीसांनी टँकर चालका विरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# मोटारसायकल व मालट्रकच्या अपघातात महिलेचे निधन

करमाळा(सं.प्र.) : पुढे जाणाऱ्या मोटारसायकलला पाठीमागून येणाऱ्या मालट्रक ने धडक देऊन झालेल्या अपघातात ५९ वर्षाची महिला मृत्यू पावली आहे. तर मोटारसायकलचे १३ हजाराचे नुकसान झाले आहे. हा अपघात ४ नोव्हेंबरला रात्री नऊच्या सुमारास कंदर गावाजवळ घडला आहे. या प्रकरणी नितीन आजिनाथ गाडे (रा.वाघोली, ता.माळशिरस) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ४ नोव्हेंबरला सकाळी अकरा वाजता माझे काका नारायण नामदेव ठोसर यांच्या अंत्यविधीच्या कार्यक्रमासाठी करंजे येथे आलो होतो. त्यानंतर रात्री पुन्हा आम्ही कंदर मार्गे गावाकडे जात असताना कंदर गावाच्या पुढे पेट्रोल पंपाजवळ पाठीमागून आलेल्या मालट्रकने मोटारसायकलला पाठीमागून धडक दिली. त्यात मी रोडच्या डाव्या बाजुला पडलो तर माझी आई उजव्या बाजुला पडली. माझ्या आईच्या डोक्यावरून मालट्रकचे चाक गेल्याने ती जागीच ठार झाली आहे. या अपघात झाल्यानंतर ट्रक निघून गेला आहे. या अपघातात माझ्या मोटारसायकलचे १३ हजाराचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी पोलीसांनी मालट्रक चालकाविरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक साने हे करत आहेत.

# ग्रामपंचायत निवडणुकीचा राग मनात धरून कोयत्याने मारहाण

करमाळा(सं.प्र.) : ग्रामपंचायत निवडणुकीचा राग मनात धरून दांम्पत्यास एकाने कोयत्याने व खोऱ्याच्या दांड्याने मारहाण केली आहे. हा प्रकार ६ डिसेंबरला सायंकाळी सव्वापाच भगतवाडी येथे घडला आहे. या प्रकरणी मारूती अंकुश गिरंजे (रा.भगतवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ६ डिसेंबरला सायंकाळी शेतात गेलो असता माझी पत्नी सीमा गायीचे दुध काढत असताना माझा चुलतभाऊ सचिन संदिपान गिरंजे हा ओरडत व शिव्या देत आला व ग्रामपंचायतीत मतदान का केले नाही म्हणून त्याने माझ्या पत्नीच्या हाताच्या पोटरीवर कोयत्याने मारले. मी सोडविणस गेलो असता त्याने माझ्या हातावर खोऱ्याचा दांडा फेकून मारला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# आजोळी आलेल्या मुलीस पळवून नेले

करमाळा(सं.प्र.) : करमाळा येथे किल्लावेसीत आजोळास आलेल्या साडेतेरा वर्षे वयाच्या मुलीस कमलादेवीच्या यात्रेतून फुस लावून पळवून नेण्यात आले आहे. हा प्रकार १ डिसेंबरला मध्यरात्री घडला आहे. या प्रकरणी मुलीच्या आईने फिर्याद दिली आहे. त्यात तिने म्हटले आहे, की मी माझ्या माहेरी किल्लावेसीत देवीच्या यात्रेकरीता आले होते. ३० नोव्हेंबरला रात्री साडेदहा वाजता माझी मुलगी माझ्या नातेवाईकासह यात्रेत गेली होती. मध्यरात्रीच्या सुमारास ती गायब झाली. त्यानंतर शोधाशोध घेऊनही तिचा शोध लागला नाही. यावरून तिला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# वेगात ट्रॅक्टर चालविणाऱ्यावर कारवाई

करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरात गायकवाड चौकात वेगात ट्रॅक्टर चालविणाऱ्या चालकाविरूध्द पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार १ डिसेंबरला सकाळी साडेअकरा वाजता घडला आहे. यात पोलीस कॉन्स्टेबल दिपक नागनाथ कांबळे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १ डिसेंबरला सकाळी साडेअकरा वाजता आम्ही वाहतूक नियमन करत असताना गायकवाड चौकात गणेश जयहिंद जाधव रा.सोनेगाव, ता.जामखेड जि.नगर हा त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर एमएच १५ बीएम ००६२ हा भरधाव वेगात चालवत होता. त्यामुळे रस्त्यावरील लोकांच्या जीवितास धोका होईल असे वाहन चालवित होता. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# एस.टी.कॉलनीतील १६ वर्षाच्या मुलीस पळवून नेले

करमाळा (सं.प्र.) : येथील एस.टी.कॉलनीमध्ये राहत असलेल्या १६ वर्षाच्या मुलीस २२ वर्षाच्या युवकाने पळवून नेले आहे. या प्रकरणी अज्ञान मुलीच्या वडीलांनी पोलीसात फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मी उत्तरप्रदेशातील रहिवासी असून सध्या एसटी कॉलनीत रहावयास आहे. माझी १६ वर्षाची मुलगी घरी असताना ५ डिसेंबरला दुपारी आमच्या शेजारी राहणाऱ्या २२ वर्षाच्या तरूणाने तिला फुस लावून पळवून नेले आहे. या प्रकरणी पोलीसांनी २२ वर्षाच्या तरूणाविरूध्द गुन्हा नोंदविला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनायक महुरकर हे करत आहेत.

# गुटखा विक्री करणाऱ्यावर कारवाई

करमाळा (सं.प्र.) : करमाळा शहरातून बसस्थानक परिसरातील पान टपऱ्यावर प्रतिबंधित पान मसाला, सुगंधी तंबाखू, गुटखा, मावा आदी विक्रीला बंदी असताना असे पदार्थ आढळून आले आहेत. त्यांच्याविरूध्द अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांचेकडून १ लाख ४२ हजार ८५६ रूपयाचा माल जप्त केला आहे. या प्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागातील प्रतिनिधी नंदिनी हिरेमठ यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की करमाळा येथील बसस्टॅन्ड परिसरात इरफान बागवान, सादिक बागवान, जमीर तांबोळी, नजर कुरेशी, शकील तांबोळी यांच्या पान टपरीवर प्रतिबंधित अन्न पदार्थ, सुगंधी तंबाखू, पान मसाला, नखराली सुपारी, आरएमडी पान मसाला असा १ लाख ४२ हजार ८५६ रूपयाचा माल आढळून आला आहे. यानुसार सदरचा माल जप्त करण्यात आला असून यात पोलीसांनी सर्वांच्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# देवळाली येथे किरकोळ कारणावरून मारहाण

करमाळा(सं.प्र.) : तु आमच्या भावाला का फोन लावला.. या कारणावरून दोघा जणांनी एकास लोखंडी पाईपाने बेदम मारहाण केली आहे. हा प्रकार देवळाली येथे ६ डिसेंबरला रात्री नऊ वाजता घडला आहे. यात महेश तानाजी गोसावी (रा.देवळाली) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ६ डिसेंबरला सायंकाळी नऊच्या सुमारास मी माझ्या हॉटेलसमोर असताना राहूल भास्कर गायकवाड व प्रशांत उर्फ फंटू अशोक मोरे हे दोघेजण आले व मला शिव्या देऊ लागले. त्यावेळी तुम्ही मला शिव्या का देता.. असे विचारले असता राहूल गायकवाड म्हणाला, तु माझा भाऊ अमोल गायकवाड यास का फोन लावला. त्यावेळी मी त्याला फोन लावला नाही, तुमचा गैरसमज होत आहे.. असे म्हणताच राहुल गायकवाड याने त्याच्या हातातील लोखंडी पाईपाने मला मारहाण केली तर फंटू मोरे याने लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले आहे.

# ऊसाला टोळी देतो म्हणून १३ लाखाची फसवणूक

करमाळा(सं.प्र.) : ऊस तोडण्यासाठी ऊसतोड मजुराची टोळी देतो असे म्हणून १३ लाख रूपये घेऊन दोघा जणांनी वडशिवणे येथील शेतकऱ्याची फसवणूक केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी दोघांच्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

यात बालाजी सुदाम देवकर (रा.वडशिवणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझ्याकडे शेती सोबत स्वराज कंपनीचा व महिंद्र कंपनीचा दोन ट्रॅक्टर व चार ट्रॉल्या असून गेल्या पाच वर्षापासून विठ्ठल कार्पोरेशन म्हैसगाव व विठ्ठलराव शिंदे कारखाना पिंपळनेर येथे ऊस देण्याचे काम करतो. सन २०२२-२३ साठी मजुराची गरज असल्याने जिंतूर (जि.परभणी) येथील कृष्णा उत्तम राठोड व आकाश कृष्णा राठोड यांच्याशी संपर्क करून १० कोयत्याची मागणी केली होती. त्यानुसार त्यांनी १० कोयते म्हणजे २० माणसे पाठवतो. १४ लाख रू. द्या. त्यानुसार त्यांना वेळोवेळी १३ लाख रू. दिले. परंतु त्यांनी मजुरही दिले नाही व पैसेही परत दिले नाही. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# दोन गटात हाणामारी
## एकमेकांविरूध्द गुन्हे दाखल

करमाळा(सं.प्र.) : केम व गौंडरे येथील दोन परिवारात किरकोळ कारणावरून हाणामारी झाली असून यात एकमेकांविरूध्द गुन्हे दाखल झाले आहेत. हा प्रकार २ डिसेंबरला सायंकाळी आठ वाजता घडला आहे. यात पहिली फिर्याद नवनाथ देविदास कुदळे (रा.गौंडरे वस्ती) यांनी दिली. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मी गौंडरे फाट्यावर बसलो असता माझ्या घरी भांडण चालल्याचे समजल्याने मी घरी गेलो असता, तेथे नितीन गोरख तळेकर, गणेश महादेव दयाळ व इतर दोघेजण शिवीगाळ करत होते. त्यांना निष्कारण शिव्या देऊ नका असे म्हणालो असता, नितीन तळेकर याने हातातील लाकडी काठीने माझ्या डाव्या हातास मारले. तर गणेश दयाळ याने माझा पुतण्या शुभम कुदळे याला मारहाण केली. दुसरी फिर्याद नितीन गोरख तळेकर (रा.केम) यांनी दिली. त्यात त्यांनी म्हटले आहे, की गौंडरे शिवारात गौंडरे फाटा येथे आमचे हॉटेल आहे. या हॉटेलवर रात्री साडेआठच्या सुमारास नवनाथ कुदळे, हनुमंत कुदळे व दोन अनोळखी इसम आले व तु आमच्या घरी कशाला आला होतास.. असे म्हणून त्यांनी हातातील बांबूच्या काठीने माझ्या डोक्यात मारले. तसेच गणेश दयाळ यालाही या दोघांनी व अनोळख इसमांनी काठीने मारहाण केली. पोलीसांनी या दोन्ही गटाविरूध्द गुन्हे दाखल केले आहेत.













# एस.एस.के.एस. असोसिएटस्

## अकौंट मॅनेजर पाहिजेत

सीए फर्म मध्ये अकौटींगसाठी जागा भरणे आहे. (महिलांना प्रथम प्राधान्य)

**पदासाठी अटी खालीलप्रमाणे..**

- कामाची वेळ : सकाळी १० ते सायं ६.३० (महिलांसाठी वेळ त्यांच्या गरजेनूसार ॲडजेस्ट)
- पात्रता : कोणत्याही शाखेतील शिक्षण (मराठी, इंग्रजी नीट वाचता व लिहिता यावे) संगणक व्यवस्थित वापरता येणे आवश्यक.
- पगार : ६००० रू. किंवा त्यापेक्षा जास्त दिला जाईल.

संपर्क : सीए लहू काळे (मो.९७६२४४८२८२/९४२०४४८२८२/०२१८२-२२२१०३)

पत्ता : विद्यानगर, नवीन कोर्टासमोर, गाळा नं.१ व २, करमाळा.

टीप : येताना शैक्षणिक बायोडाटा घेवून येणे.

# तहसील कार्यालय समोरील थू थू आंदोलन स्थगित




करमाळा(सं.प्र.) : मकाई कारखान्याच्या थकीत ऊस बिलासाठी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्याकडून पुन्हा नवीन तारीख मिळाली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात आंदोलनकर्ते व कारखाना प्रशासन यांची स्वतंत्र बैठक झाली. यावेळी सत्ताधारी बागल गटाचे तत्कालीन अध्यक्ष दिग्विजय बागल, कार्यकारी संचालक हरिश्चंद्र खाटमोडे हे उपस्थित नसल्याने संताप व्यक्त करण्यात आला असून येत्या सोमवारी त्यांना उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आली आहे. तोपर्यंत करमाळा तहसील कार्यालय समोर सुरू करण्यात आलेले आंदोलन स्थगित करण्यात आले आहे; अशी माहिती प्रा.रामदास झोळ यांनी दिली.

मकाईने शेतकऱ्यांचे गेल्यावर्षीचे ऊस गाळप बिल थकवले असल्याने शेतकरी आक्रमक झाले आहेत. तहसील कार्यालय समोर थू थू आंदोलन करण्यात आले. जोपर्यंत पैसे दिले जात नाहीत तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही; असा इशारा देण्यात आला. मात्र आंदोलनपूर्वीच जिल्हाधिकारी आशिर्वाद यांनी आंदोलनकर्ते व कारखाना प्रशासन यांची बैठक बोलावली होती. या बैंकीला प्रभारी तहसीलदार विजयकुमार जाधव, प्रा.झोळ, पं.स.चे माजी सदस्य ॲड.राहुल सावंत, शेतकरी संघटनेचे रविंद्र गोडगे, शेतकरी कामगार संघर्ष समितीचे दशरथ कांबळे आदी उपस्थित होते. दरम्यान बैठक झाल्यानंतर आदिनाथचे माजी अध्यक्ष धनंजय डोंगरे, बनसोह, कारखान्याचे अध्यक्ष भांडवलकर, नवनाथ बागल यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेतली; असे प्रा.झोळ यांनी सांगितले आहे. जिल्हाधिकारी यांनी आमचा पूर्ण विषय ऐकून घेऊन प्रशासनाकडून संपूर्ण कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्याची सूचना अधिकाऱ्यांना दिली व २५ डिसेंबर पर्यंत बिले मिळतील असे सांगितले. त्यामुळे आंदोलन स्थगित करण्यात आले आहे; असे प्रा.झोळ यांनी सांगितले.

# आदिनाथ कारखान्याच्या सल्लागार पदी पाच जणांची निवड

करमाळा(सं.प्र.) : श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या सल्लागार पदी पाच जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. ७ डिसेंबर ला आदिनाथचे प्रशासक मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब बेंद्रे यांनी कारखाना सल्लागार पदी सुहास गलांडे (कों.चिंचोली), हरिदास डांगे (माजी कार्यकारी संचालक), धुळाभाऊ कोकरे (कुगाव), डॉ.वसंतराव पुंडे (करमाळा), अच्युत तळेकर (केम) यांची नियुक्त केली आहे. निवडलेल्या पाच सल्लागारांचा सत्कार आदिनाथच्या प्रशासक मंडळाकडून करण्यात आला.

**बागायत जमीन विकणे आहे**

पोथरे (ता.करमाळा) हद्दीतील गट नं.२३६/४ ही रोडटच असलेली बागायत जमीन विकणे आहे.

**संपर्क :वैभव रिखवलाल दोशी, मो.7588392921**

# करमाळा मतदार संघातील रस्ते व बांधकामासाठी ६८ कोटीची तरतूद : आ.शिंदे



करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्र विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबर पासून नागपूर येथे सुरू झाले आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी डिसेंबरच्या पुरवणी अर्थसंकल्पामध्ये बांधकामासाठी तरतूद केल्याची बजेट प्लेट जाहीर झाली असून, यामध्ये करमाळा मतदार संघातील प्रमुख जिल्हा मार्ग, ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग यांच्यासह तलाठी व सर्कल कार्यालय बांधकामासाठी तब्बल ६८ कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे. या निधीमुळे तालुक्यातील मुख्य रस्त्यांचा प्रश्न निकाली निघणार आहे; अशी माहिती आमदार संजयमामा शिंदे यांनी दिली.

या निधीमधून महसुल विभागातील आठ मंडल अधिकारी कार्यालय व वीस तलाठी कार्यालयाची बांधकामे करण्यासाठी ४ कोटी २० लाख निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच पारेवाडी ते वाशिंबे रस्ता मोठ्या पुलाचे बांधकाम करणे – ३ कोटी ४७ लाख, कुगाव चिखलठाण शेटफळ जेऊर रस्ता – ४ कोटी ९० लाख, पांडे शेलगाव क घोटी केम रस्ता – ३ कोटी, कोर्टी दिवेगव्हाण पारेवाडी रेल्वे स्टेशन रस्ता – ३ कोटी, रावगाव वीट झरे पोफळज केडगाव रस्ता – १ कोटी, मिरगव्हाण निमगाव, नेरले वरकुटे रस्ता – १ कोटी, वांगी नं.२ – २ कोटी, फिसरे हिसरे हिवरे ते कोळगाव रस्ता – २ कोटी, केत्तूर नं.२ ते केत्तूर नं.१ वाशिंबे सोगाव रस्ता रुंदीकरणासह काम – ७ कोटी ५० लाख, मांजरगाव कोर्टी ते जिल्हा हद्द रस्ता – ५ कोटी, उमरड ते कोठावळे धनगरवाडी रस्ता – १ कोटी, सोगाव रस्ता – १ कोटी ७० लाख असा तब्बल ४१ कोटींचा निधी करमाळा तालुक्यातील रस्ते विकासासाठी मंजूर झालेला आहे. तसेच करमाळा मतदार संघाला जोडलेल्या ३६ गावांसाठी २३ कोटींचा निधी मंजूर झालेला आहे. या निधीमधून कव्हे लहू म्हैसगाव रस्ता – २ कोटी ७० लाख, रोपळे वडशिवणे कंदर रस्ता – २ कोटी ७० लाख, जिल्हा हद्द ते रिधोरे तांदुळवाडी सुलतानपूर रस्ता – २ कोटी ४० लाख, अकोले खुर्द कन्हेरगाव निमगाव ढवळस रस्ता – २ कोटी, वडाचीवाडी ते सापटणे रस्ता – १ कोटी ५० लाख, पिंपरी – २ कोटी, निमगाव ते उपळवटे – ५ कोटी, रोपळे ते मुंगशी रस्ता – ८० लाख, कव्हे ते शिंगेवाडी रस्ता – १ कोटी, रोपळे बिटरगाव शिंगेवाडी रस्ता – १ कोटी २० लाख अशी निधीची तरतूद केलेली आहे. करमाळा मतदार संघासाठी तब्बल ६८ कोटी निधी रस्ते व बांधकामासाठी मंजूर झाल्यामुळे हा आ.शिंदे यांचा निवडणुकीच्या तोंडवरती मास्टर स्ट्रोक मानला जात आहे.

# कुंकूगल्ली येथील चोरीचा तपास - चार जणांना अटक

करमाळा(सं.प्र.) : शहरातील कुंकू गल्ली येथील सोमनाथ बरीदे हे किराणा सामान आणायला गेल्यावर दि.२९ रोजी बारा च्या दरम्यान घरात प्रवेश करून आतील लोखंडी कपाटातील ४० हजार रू. किंमतीचे सोन्याची अंदाजे एक तोळा वजनाचे चोख बिलवरी, २० हजार रू. किंमतीच्या सोन्याच्या अर्धा तोळा वजनाच्या दोन अंगठ्या, ६० हजार रू. किंमतीची सोन्याची चेन लॉकेट, २० हजार रू. किंमतीचे सोन्याचे चोख बिलवरी असा एकूण १ लाख ४० हजार रूपयाचा मुद्देमाल चोरणाऱ्या चौघांना अटक करण्यात आली आहे.

सदर आरोपींचा शोध घेत असताना करण उर्फ बंब्या अंबादास (वय–२४, रा.करमाळा), सुशिल उर्फ बबलू नामदेव गायकवाड (वय–२४, रा.मुथानगर करमाळा), आफताब मेहबुब शेख (वय–१९, रा.पांडे), गणेश पांडुरंग शिंदे (वय–१८, रा.कामोणे) यांच्याकडे तपास केला असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांच्याकडून गुन्ह्यातील गेलेला माल १ लाख ४० हजार रू. किंमतीचे सोने, त्यात एक सोन्याची चैन व अंगठ्या असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जोतीराम गुंजवटे , पोलीस हवालदार अजित उबाळे, भाऊराव शेळके, पोलीस नाईक चंद्रकांत ढवळे, पोलीस कॉन्स्टेबल सोमनाथ जगताप, गणेश शिंदे, तौफिक काझी यांनी कारवाई केलेली आहे.





12 डिसेंबर
हा दिवस आनंदाचा आहे.
वाढदिवस आमच्या **साहेबांचा** आहे
विसरू म्हणता.. विसरता येत नाही
तुमचा वाढदिवस सदैव आठवणीत राही
वाढदिवसाला तुमच्या..,
आकाशातून फुलांचा वर्षाव व्हावा
तुमचा सहवास नेहमी सोबत असावा..!
किंगमेकर व आमचे नेते
मा.श्री. जयवंतरावजी जगताप साहेब
सभापती, करमाळा कृषी उ.बा.समिती/माजी आमदार
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक
के.बी.कन्स्ट्रक्शन, करमाळा.
किशोर भगत
प्रितम भगत (इंजि अँन्ड कॉन्ट्रॅक्टर)




सभापती/माजी आमदार
करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती
सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सह.बँकेचे संचालक
करमाळा तालुक्याचे किंगमेकर व माजी आमदार
मा.श्री.जयवंतराव जगताप साहेब
आपणांस दि.१२ डिसेंबर रोजी असलेल्या
वाढदिवसास लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा...
चेअरमन, वि.का.सो. सौ.लक्ष्मी आमृळे
व्हा.चेअरमन, वि.का.सो. अर्जुन गायकवाड
ग्रा.पं.सदस्य प्रशांत चौधरी
ग्रा.पं.सदस्या सौ.राधाबाई बोराटे
ग्रा.पं.सदस्या सौ.सोनाली कोकाटे
सदस्या, झरे सोसा. सौ.कमल कांबळे
सदस्य, झरे सोसा. अशोक गुंजाळ
सदस्य, झरे सोसा. अकबर मुलाणी
सदस्य, झरे सोसा. महादेव घाडगे
सदस्य, झरे सोसा. भानुदास बोराटे
सदस्य, झरे सोसा. पांडुरंग मावलकर
सदस्य, झरे सोसा. अशोक सरादे
सदस्य, झरे सोसा. राजेंद्र मावलकर
सदस्य, झरे सोसा. महादेव काळे
सदस्य, झरे सोसा. दत्तू चौधरी
सदस्य, झरे सोसा. कैलास कोठावळे
शुभेच्छुक
विकास(दादा)आमृळे मित्र परिवार
व समस्त ग्रामस्थ, झरे ता.करमाळा